# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १७/७/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०५) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक **१७ जुलै २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
2. श्री. मधुकर दामोधर सावंत
3. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. मो. जावेद मो. इसाक
6. श्री. अ. रशीद खान (मामु)
7. श्री. वसंत पांडूरंग नरवडे
8. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
9. श्री. संजय रामदास जोशी
10. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
11. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
12. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
13. श्री. अ. साजेद अ. सत्तार
14. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती :नव्याने रूजूझालेले उपआयुक्त यांचा परीचय देण्यात यावा.

उपआयुक्त(प्र.) : शासनाने उपआयुक्त म्हणून श्री. सोमनाथ शेटे यांची महापालिकेमध्ये नियुक्ती केली असून तीन दिवसापूर्वी त्यांनी उपआयुक्त पदाचा पदभार स्विकारलेला आहे.

श्री.अ.रशिद खान : वर्ग-१ मध्ये की वर्ग-२ संवर्गात येतात. महापालिकेचे अधिकारी त्यांचे अखत्यारीत काम करणार की ते महापालिकेच्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीत काम करणार याचा खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र.) : वर्ग-२ मधून त्यांना वर्ग-१ मध्ये पदोन्नती मिळालेली आहे. त्यानुसार महापालिकेच्या उपआयुक्त पदावर वर्ग-१ संवर्गात ते काम करीत आहेत. कार्यालयीन कामाच्या बाबतीत दोन तीन दिवसात मा.आयुक्त आदेश काढतील.

श्री.अ.रशिद खान : महापालिकेचे अधिकारी त्यांचे हाताखाली काम करणार काय? शासनाने चूक केली तर महापालिका प्रशासनही चूक करणार आहे का?

श्री.संजय शिरसाट : एकाच संवर्गातील पद असतांना एक उपआयुक्त दुसऱ्या उपआयुक्ताबद्दल खुलासा करू शकतात का. मा. आयुक्त सभेला येणार असतील तर त्यांचेकडून खुलासा घ्यावा.

उप आयुक्त : मी, सोमनाथ शेटे महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत १९८९ साली मुख्याधिकारी या पदावर कार्यरत झालो. त्यानंतर गेल्या १२ एप्रिल २००७ रोजी वर्ग-१ संवर्गात पदोन्नती झालेली आहे. माझे मुळ वेतन ८०००-१३५०० या रेंजमध्ये असून सध्याचे माझे मुळ वेतन १ ऑगस्टला १०७५० होईल. माझे पद वर्ग -१ मध्ये येते.

श्री.अ.रशिद खान : महापालिकेत वर्ग -१ संवर्गात येणारे अधिकारी आहे. त्यांचे वेतन यांचेपेक्षा जस्त असेल तर ते यांचे अंडर मध्ये काम करतील का. शासनाची चूक झाली असेल प्रशासनही चूक करणार आहे का बाहेरील अधीकारी घेणार असेल तर महापालिकेच्या अधिकार का घेवू शकत नाही.

(याच वेळी मा. आयुक्त सभागृहात प्रवेश करतात.)

मा. सभापती : नवीन उप आयुक्त रूजूझालेले आहे त्या बाबतीत मा. आयुक्तांनी खूलासा करावा.

मा. आयुक्त :जेंव्हा शासन प्रमोशनने अधिकारी पाठवतात. शासनाच्या स्केल मध्ये तसेच महापालिकेच्या स्केल मध्ये जनरली फरक असतो. आयुक्तापेक्षा जस्त पगार घेणारे अभियंता या महापालिकेत आहे. महापालिका काही वेळा जस्तीची वेतनश्रेणी शासनाकडून मंजूर करून घेते. उपजिल्हाधिकारी यांचाही हाच स्केल असतो स्केलचा व पदाचा जनरली काही संबध नसतो.

श्री.अ.रशिद खान :नगरपरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी हे आयुक्त म्हणून येतात. डायरेक्ट मुंबईला बदली होवू शकते यात जेष्ठतेची गरजनाही काय?

मा. आयुक्त : चार उपआयुक्तांचे पद या महानगरपालिकेत आहे त्यापैकी लोकलसाठी किती पदे असावीत म्हणून सेवा भरती नियमात कुठेही उल्लेख नाही. आजच्या स्थितीला चारही अधिकारी शासनाचे येवू शकतात किंवा चार अधिकारी लोकलचे असू शकतात.किती टक्के ही पदे लोकल असावीत असे नियमावलीत नमूद नाही.जसे डायरेक्ट आयएएस ६५ टक्के तर प्रमोटेड ३५ टक्के असावेत असे नियम आहे.शासनाने एक अधिकारी पाठविले आहे. शासनाने जर एखादया अधिकाऱ्याची नेमणूक केली असेल व त्याबध्दल कूणाचे वेगळे मत असेल ज्यांनी आदेश काढले आहे त्यांना निवेदन दयायला पाहिजे शासनाचा निर्णय अंतिम राहिल.

श्री.अ.रशिद खान : या महापालिकेत अनेक दिवसापासून अधिकारी काम करतात.बाहेरील अधिकारी नियुक्त करीत राहिल्यास त्यांना या पदाची संधी केंव्हा मिळणार आहे.शासनाची चूक असेल तर यापुर्वी शासनाने नियुक्त केले होते. त्यांना परत पाठवले. या महानगरपालिकेत वर्ग-१ धील १०-१० वर्ष सेवा करणारे अधिकारी आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली का करावे लागते.

मा. आयुक्त :शासनाची यात चूक नाही. चारही अधिकारी शासनाचे मागवू शकतो किंवा चारही अधिकारी येथील प्रमोशनने घेवू शकतो. सेवा भरती नियमावलीत दुरूस्ती करावी लागेल.

श्री.अ.रशिद खान : उपआयुक्त म्हणून श्री. शेटे यांना पदोन्नती होवून नुकतीच वर्ग -१ मध्ये आले परंतू या महापालिकेत १० वर्षापासून वर्ग -१ मध्ये काम करणारे अधिकारी आहे.

श्री.संजय शिरसाट : शहर अभियंता यांना जवळपास ३० हजर पगार आहे.आयुक्तांच्या वर पगार असेल अशा वेळी शहर अभियंता यांनी उपआयुक्त की आयुक्तच्या अंडरमध्ये काम केले पाहिजे.शहर अभियंता म्हणून त्याचे स्टेटस् काय आहे.

मा. आयुक्त :टेक्नीकल संवर्गातील कर्मचाऱ्याचा जनरली वेतनश्रेणी जस्त असते. शहर अभियंता हे विभाग प्रमुख आहेत.

श्री.संजय शिरसाट : असे होवू शकत नाही. कार्यअभियंता सूधदा विभाग प्रमूखच आहे. उपआयुक्ताचे वरील जसे मा. आयुक्त असतात तसे शहर अभियंता हे पूर्ण कार्य. अभियंत्याचे विभाग प्रमूख आहे.

मा. आयुक्त : विभाग प्रमुख हे थोडया कामासाठी डिफाईन करतो. या महापालिकेत अतिरिक्त आयुक्त नाही तरी पण उपआयुक्त हे थोड्या कामासाठी विभाग प्रमूख आहेत. अतिरिक्त आयुक्त यांचा स्केल शहर अभियंता यांचेपेक्षा कमी असेल जेंव्हा अतिरिक्त आयुक्त असतात तेंव्हा शहर अभियंता यांचेकडे चार्ज न देता अतिरिक्त आयुक्त यांचेकडे आयुक्त चार्ज देतात. येथे आयुक्त हे उपआयुक्त यांना चार्ज देतात.

श्री.संजय शिरसाट : कार्य. अभियंता जेंव्हा सूट्टीवर जतात त्यांचा चार्ज जेईकडे दिला जतो. शहर अभियंता ही जबाबदारीचे पद आहे त्याचे डायरेक्ट आयुक्ताशी ॲटॅचमेंन्ट असायला पाहिजे.

मा. आयुक्त :अशा वेळी जेई कडे चार्ज न देता उपअभियंता यांचेकडे दिला पाहिजे. शहर अभियंता हे डायरेक्टली आयुक्तांशी ॲटॅच असतात. त्यांचे गोपनीय अहवाल आयुक्त लिहतात.

श्री.संजय शिरसाट : स्थायी समितीला सूध्दा सीआर लिहण्याचे अधिकार आहे परंतू अमलात आणले जत नाही.

श्री.संजय जेशी : मुख्य अग्निशमन अधिकारी यांना उपआयुक्ताच्या अंडरमध्ये का ठेवले होते.उपअभियंता यांचा पगार उपजिल्हाधिकारी यांचे बरोबरीने आहे. परंतू उपआयुक्त दर्जच्या अधिकाऱ्यानी कार्यकारी अभियंत्यांना बोलवू शकतात का?हे बरोबर आहे का?

मा. आयुक्त : मी जेंव्हा प्रथमत: सहा. जिल्हाधिकारी होतो तेंव्हा माझे पगारापेक्षा एका वरीष्ठ लिपीकांचा पगार जस्त होता.

श्री.संजय शिरसाट : जे उपआयुक्त येतात त्यांना निवासस्थान, वाचमन , वाहन तसेच चार पाच कर्मचारी कामासाठी दिले जते. त्यांचा स्केल हा उपअभियंत्याचा असतो. आयुक्तांना मुंबईला जयचे असेल तर विमानाने जण्याची परवानगी दिले जते उपआयुक्तांना नाही कारण ते त्या रँकचे नसतात. ज्या सुविधा उपआयुक्तांना दिल्या जतात त्या कशाच्या अधारे दिल्या जतात त्यांचे नॉर्मस् असतील.

मा. आयुक्त :अधिकाऱ्याना सुविधा हया पदानुसार असतात स्केल नुसार नाही.माझे माहिती प्रमाणे शहर अभियंता यांचे बेसीक माझेपेक्षा जस्त आहे.

श्री.संजय जेशी : उपजिल्हाधिकारी यांना एक जीप गाडी असते. सरकारी निवासस्थान नसते त्यांचे निवासस्थानी सरकारी कर्मचारी कामासाठी नसतात सुरक्षा रक्षकही नसतात. परंतू महानगरपालिकेत उपआयुक्त म्हणून आल्यानंतर त्यांना आर. आर. मध्ये तरतूद नसतांना ह्या सुविधा का दिल्या जतात.

मा. आयुक्त : उपआयुक्तांना किंवा इतर अधिकाऱ्यांना काय सुविधा द्यायला पाहिजे हे सर्वसाधारण सभेने ठरविले पाहिजे पॉलीसी मॅटर आहे. आर. आर. नुसार निर्णय घ्यायचा असेल तर शासनाची मंजूरी लागेल.

श्री.संजय जेशी :उपआयुक्तांना ज्या सुविधा देतो धोरणात्मक निर्णय म्हणून ठराव असेल. एखादी नवीन सुविधा सुरू केली, दुसरे रूजू झाले ते नाराज होवू नये म्हणून तीच सुविधा पुढे चालू ठेवली नाराजी होत असेल परंतू महापालिकेने किती दिवस सहन करायची.

श्री.संजय शिरसाट : अशा प्रकारचा ठराव झालेला नाही. प्रशासनाला वाटेल त्या सुविधा दिल्या जतात.

मा. आयुक्त : कोणत्या अधिकाऱ्यांना काय सुविधा दयाव्यात या बाबतीत धोरण ठरविणे आवश्यक आहे तसा निर्णय करून घेतला पाहिजे.

श्री.संजय जेशी : निवासस्थानाचा विषय आला म्हणून सांगतो की सिडकोकडून अग्निशमन केंद्र साठी जगा घेतली होती परंतू तेथे एका अधिकाऱ्याचे निवास्थान बाधलेले आहे. ज्या ठराविक सुविधा पाहिजे त्या बाबतीत प्रशासनाकडून सभागृहासमोर मंजूरी साठी यायला पाहिजे. वार्ड अधिकारी हे एकाच संवर्गात येतात. एकास चार चाकी (कार)वाहन दिले. त्याच रँक मधील दुसऱ्या अधिकाऱ्याना चार चाकी वाहन (कार)दिली नाही.

मा. आयुक्त : यात दोन गोष्टीचा विचार करावा लागेल. त्या अधिकाऱ्याचा स्केल काय आहे तसेच त्यांचे कामाचे स्वरूप काय आहे. जसे आरडीसी. उपजिल्हाधिकारी असतात त्यांना कार नसते. त्यानूसार शासन सूध्दा कामाचा विचार करून वाहन सुविधा देते. महानगरपालिकेने कोणत्या अधिकाऱ्याना काय सूविधा दिल्या पाहिजे याचे पॉलीसी निर्णय करून घ्यायला पाहिजे.

श्री.वसंत नरवडे : सन १९८२ पासून आजपर्यंत या संबधी कोणत्याही पदाधिकारी किंवा सदस्यांनी चर्चा केलेली नव्हती. परंतू या बाबतीत आता नियम करण्याची गरज आहे. दोन उपआयुक्त महापालिकेचे तर दोन शासनाचे असावेत त्यामूळे महानगरपालिकेवर अंकूश राहिल.

श्री.अ.रशिद खान : प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्त असतातच परंतू दोन महापालिकेचे व दोन बाहेरील उपआयुक्त असावेत.

श्री.संजय शिरसाट : मागील सर्वसाधारण सभेत ठराव घेवून हातगाडी संबंधात धोरण ठरविणयात आले. रू.३६५/- प्रतीवर्ष आकारणी करणार. लायसन्स घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरला रोज सकाळ, सध्यांकाळ गर्दी असते. ७ हजर लायसन्स दिले ३० लक्ष वसूल केले शहराची भौगोलिक परीस्थितीचा विचार करून किती लायसन्स द्यायचे याचा विचार केला असावा.किती लायसन्स देणार व शहरात एकूण रस्ते किती आहे.हया हातगाडया फिरत्या राहतील असे म्हटले असले तरी रेल्वेस्टेशन, गुलमंडी, शहागंज, रंगारगल्ली पैठणगेट, पुंडलिगनगर भागात सकाळी लावलेली गाडी रात्री १०.०० वाजेपर्यत उभी असते. आजही झोनींग झालेले नाही झाले तरी शहरात रस्ते किती ७ हजर हातगाडया रस्त्यावर आल्यातर चालवायला जगा राहणार नाही अशी परीस्थिती होईल.हे शहर ऐतिहासिक शहर असून भविष्यात येणारे पर्यटकांनी हे हातगाड्याचे शहर असे म्हणायला नको. नेमकी पॉलीसी काय ठरविली आहे. काही एजंन्ट लोक हातगाडया भाडयाने देतात. पाच ते सात हजराची गाडी घेवू शकत नाही गाडी भाड्याने घेवून दिवसाचे भाडे ५० देवून गाडीचा वापर

करतो. ७ हजर हातगाड्याना लायसन्स दिल्यानंतर ९८ वार्डात प्रत्येक वार्डात सरासरी १०० ते १५० हातगाडया रस्त्यावर येतील. याबद्दल पॉलीसी काय आहे याचा खुलासा करावा.

श्री.वसंत नरवडे : हॉकर झोन ठरविले होते. एका हॉकर झोन मध्ये किती हातगाडया ठेवायचा याचा निर्णय झालेला नाही. हॉकर झोन कुठले केले याची चौकशी करावी. दिलेले लायसन्स आताच वापरात आणायचे का ? एकाच कुटूंबातील सुशिक्षित बेकार आहे म्हणून १०-१० लायसन्स काढलेले सुशिक्षित बेकाराची काय परीस्थिती आहे. बाहेरील आलेल्या लोकांनी या शहरात किती परवाने घेतलेले आहे. स्थानिक लोकांनी त्यांना रहिवासी प्रमाणपत्र तसेच रेशन कार्ड दिले. लाईट बिलाचे झेरॉक्स प्रती दिल्या नगरसेवकाकडे रहिवासी प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. ज्यांचे नाव मतदार यादीत नाही अशा लोकांनाही लायसन्स दिले गेले. कुणासही मागणी केल्यानूसार देण्यात येत असेल तर या शहरात वाहतुकीला अडथळा होवू नये पोलीस विभागाशी संपर्क करून या बाबतीत धोरण ठरवावे. शहरातील नागरीकांची कुचंबणा होणार नाही याची दखल घ्यावी.जिल्हा परीषद च्या समोर फुटपॉथवर बुटाच्या दुकाना लागलेल्या आहेत्या काढण्याकडे कुणाचेही लक्ष नाही.

श्री.अ.रशिद खान : प्रत्येक वार्ड निहाय किती ठिकाणी हातगाडया लावून व्यवसाय करतात वार्ड अधिकारी यांचेकडून माहिती घ्यावी जे लायसन्स दिले ते कुठे व्यवसाय करणार आहेयाचापण खूलासा धेण्यात यावा.एक वार्डात पाच सात हातगाडया सध्या व्यवसाय करतात. जर १०० हातगाडया एका वार्डात फिरणार असेल तर वाहतूकीस अडचण निर्माण होवू शकते.७ हजर लायसन्स दिले १००० ते १५०० पेक्षा जस्त लायसन्स देवू नये. ज्यांनी घरासमोर गाडी उभी करण्यासाठी लायसन्स घेतले असेल त्याचाही सर्वे करावा. नियंत्रण ठेवावे लागेल नसता हे शहर हातगाडी नावाने ओळखले जईल.

मा. आयुक्त : आतापर्यंत लायसन्स दिले जत नव्हते. कुणीही हातगाडी ध्यायची व रस्त्यावर फिरून व्यवसाय करायचा यावर कन्ट्रोल नव्हते. यात किती हातगाडयावर धंदा चालवू शकतो यावर अवलंबून आहे. व्यवसाय चालला तर तो करीत असतील नसता बंद करीत असे. त्यावर कन्ट्रोल करण्यासाठी लायसन्सची पध्दत केली असून जर त्या वर अॅक्शन घेतो. संगणकावर फोटोसह माहिती आहे. गाडी धरली तर पुन्हा देणार नाही. लायसन्स रद्द करून पुन्हा केंव्हाही त्या व्यक्तीला लायसन्स दिले जणार नाही त्यासाठी त्यांचे फोटो वगैरे घेवून संगणकामध्ये नोंद केलेले आहे. जर निगेटीव्ह झोन करायचे असेल तर लायसन्स देणे गरजेचे आहे. झोन वाईज लायसन्स दिले असते तर क्रांतीचौक सारख्या ठिकाणच्या व्यक्तीने ३६५/-रू. भरणा करून ते लायसन्न दुसऱ्यानां ३ हजर मध्ये विक्री केले असते. येथील जगा दुसऱ्या ठिकाणापेक्षा जस्त किंमतीची आहे. लायसन्स देण्याचे बंद केले तर ज्यांनी घेतले ते व्यवसाय न करता दुसऱ्याना जस्त किमतीने विक्री करतात.जे खऱ्या अर्थाने व्यवसाय करणारा आहे त्याची कुचंबणा होईल. किती व्यवसाय चालवू शकतो यावर हातगाडया असतील दहा हजर लोकांनी लायसन्स घेतले परंतू त्यांचेकडून व्यवसायच होणार नसेल तर विकत कूणी घेणार नाही.ज्यांना व्यवसायच करायचा ते ३६५/-रू. भरणा करून घेणार जस्तीच्या रक्कमेत दुसऱ्याकडून घेणार नाही.

हातगाडी एक दिवसाचे भाडे २० ते ५० रू. असून महापालिका एक रूपया आकारत आहे.

श्री.संजय शिरसाट : लोक काय ब्लॅकमेल करीत असतील ते करू दया. उदया क्रांतीचौक ठिकाणी २०० हातगाडया उभ्या राहिल्यास वाहतुकीस अडचण निर्माण होईल. चालती गाडीचे लायसन्स घेतले म्हणून कुठेतरी एका ठिकाणी जेंव्हा ग्राहक येते त्यावेळी गाडी थांबणारच आहे. यात शंका नाही.हातगाडी एक लाईनने उभ्या केल्या तर किती कि.मीटरचा रस्ता व्यापेल याचा विचार केला काय?लोक लायसन्स घेवून ब्लॅकमेल करतील म्हणून हातगाडया वाढवायचा हे बरोबर वाटत नाही.या शहरात लाखो रूपये विकास कामासाठी खर्च होत आहे. झाडे लावत आहोत.

मा. आयुक्त : ज्या अटी व शर्ती दिल्या जणार आहे. त्यानूसार जेनिगेटिव्ह झोन व एरिया असणार त्या ठिकाणी हातगाडी जणारच नाही. तशी सर्वसाधारण सभेकडे त्या रस्त्याची यादी पण दिलेले होती. पदाधिकाऱ्यानी कमी जस्त करून निर्णय घ्यावा असे ठरले. लायसन्स देतांना ज्या अटी शर्ती आहे त्यात असे दिले की ज्या ज्या वेळी महापालिका निगेटिव्ह झोन डिक्लेर करेल तेथे हातगाडी उभी किंवा तेथून जण्यात मनाई असणार आहे.

श्री.संजय शिरसाट : निगेटिव्ह झोन मध्ये जरी जणार नसेल परंतू ७ हजर हून १० हजर पर्यत लायसन्स देण्याचे काम होईल. त्या दहा हजर गाडया शहरात कोणत्या रस्त्यावर उभ्या राहणार आहे.

मा. आयुक्त : जर व्यवसाय चांगला होत असेल तरच १० हजर गाडी रस्त्यावर उभ्या राहतील.

श्री.संजय शिरसाट :याचा अर्थ पैसे घेवून लायसन्स देवून ब्लॅक मेल करतो का जेलायसन्स घेतात त्यांना व्यवसाय चालेल असेच वाटते.

मा. आयुक्त : लायसन्स घ्यायचे की नाही हा संबधीतांचा प्रश्न आहे. जे३० लक्ष मिळाले ते खर्च करून एक फीरते पथक तयार करणार की कोणत्याही निगेटिव्ह झोन मध्ये हे लोक हातगाडी घेवून फिरणार नाही. जे काही खर्च येणार हा लायसन्स फिसमधून भरून काढणार यापूर्वी लायसन्स देत नव्हतो जर व्यवसाय असता तर १० हजर गाडी रस्त्यावर फिरले असती.

श्री.संजय शिरसाट : नवीन आयुक्त येणार पॉलीसी बदणार १० हजर गाडया रस्त्यावर येणार. स. सदस्य श्री. संजय जेशी यांचे वार्डात रस्त्यावर हातगाडया उभ्या होत्या तर लोकांनी अंदोंलन केले होते. लिमीटेड लायसन्स देण्याची कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : लिमीटेड दिले तर ज्यांनी १०-१० लायसन्स घेतले त्यांचा उद्येश सफल होईल ते जस्तीने दुसऱ्याना विकतील.यावर्षी पींक कलर दुसऱ्या वर्षी वेगळा कलरचे तर तिसऱ्या वर्षी आणखी वेगळया कलरचे लायसन्स देणार आहोत. एक वर्षासाठी आहे बदल करायचा असेल तर पूढील वर्षीपासून करावा.

श्री.संजय शिरसाट : लायसन्स देण्याचे लिमीट ठेवावे नसता हे शहर हातगाडयाचे म्हणून ओळखले जईल. यापूर्वी रिक्षाचे परमिट आरटीओ विभागाने खुले आम दिले नंतर बंद करावे लागले. कारण बाहेरचे लोक येथे येवून रिक्षा चालवू लागले. ज्याला लायसन्स देणार त्यांचा त्यावर फोटा असला पाहिजेतसेच जेंव्हा हातगाडी घेवून फिरेल तेंव्हा त्यांचेकडे त्याचे फोटोसहीत लायसन्स असावयास पाहिजे

मा. आयुक्त : एखादा व्यक्ती म्हटला की मला हातगाडया देवून व्यवसाय करायचा काय करणार आहात.

श्री.संजय शिरसाट : असे होत असेल तर टपरी धारकांनाही परवानगी दयावी.

मा.आयुक्त : टपरी धारकांना देता येणार नाही मा. न्यायालयाने मनाई केलेली आहे. त्याचा महसूल जस्त आहे. टपऱ्या दयायला नको म्हणून हातगाडयाचे लायसन्स देण्याची मोहिम हाती घेतली आहे.

श्री.संजय जेशी : निगेटीव्ह झोन तात्काळ जहीर करावेत. गुलमंडी सारख्या ठिकाणी रस्ता ताब्यात घेण्यासाठी लाखो रूपये महापालिकेने खर्च केले ज्यांचे बांधलेले दुकान होते ते तोंडले त्या जगेवर हातगाडीवाले उभे राहतात. ही परीस्थिती महापालिकेमूळे निर्माण झाली जे उद्देश होता तो सफल झाला नाही. जेथे गर्दीचा भाग आहे तेथे हातगाडया जयला नको.

मा. आयुक्त :जे भाग निगेटीव्ह झोन मध्ये डिक्लेर केला त्या भागात हातगाडया येवू नये म्हणून सुरक्षा रक्षक ठेवावे लागतील त्याचा खर्च हा लायसन्सच्या फिसमधून करावा लागेल. लायसन्स दिले तर कन्ट्रोल करणार दिले नाही तर कन्ट्रोल करणे शक्य नाही. निगेटीव्ह झोन स.पदाधिकारी यांनी लवकरात लवकर जहीर करावे.

श्री.अ.रशिद खान : दुकानदार हातगाडी धारक यांचेकडून ५० रू. रोजचे घेतात. महापालिकेला एक रूपया मिळतो यात महापालिकेचा तोटा आहे.

मा. सभापती :किती लायसन्स दिले माहिती द्यावी.

प्र. मालमत्ता अधि. : ६४५० लायसन्स दिले त्या माध्यमातून महापालिकेला २३,५४,२५०/-रू. जमा झाले. ते देतांना नगरसेवकांचे रहिवासी प्रमाणपत्र, रेशनकार्ड, ओळखपत्र असेल तर ते ग्राहय धरलेले आहे. किंवा काहींनी मतदानओळखपत्र तसेच लाईटबील घेतलेले आहे.

मा.आयुक्त : मतदार यादीत नाव असेल. ओळख पटली पाहिजेअशांना दिलेले आहे.

श्री.संजय शिरसाट : लिमीट ठेवावे तेवढेच लायसन्स द्यावे नसता या शहराची परीस्थिती वाईट होईल. ऐतिहासिक शहर म्हणून राहणार नाही. सर्वसाधारण सभेने पॉलीसी ठरविली नाही. किती ही द्यावे असे ही म्हटलेले नाही. प्रशासनाला रस्ते किती लायसन्स किती दिले पाहिजे याची माहिती व्हावी म्हणून सभागृह विश्वास ठेवते. कितीही लायसन्स दयावे असे म्हटलेले नाही. २३ लक्ष वसूली केले. सुरक्षा रक्षकावर खर्च करणार ते हातगाडी धारकाशी वाद करतील हे अधिकार देता येतात का? ठेकेदाराला हातगाडी वाले यांचे लायसन्स तपासणीचा कोणताही अधिकार नाही त्या कामासाठी महापालिकेचेच अधिकारी नियुक्त करावे लागतील.६४५० दिले आता बंद करावे.

श्री.संजय जेशी : सर्वसाधारण सभेत निर्णय घ्यावा लागेल.

श्री.संजय शिरसाट : सर्वसाधासरण सभेच्या मान्यतेची गरज नाही. लायसन्स देण्याचे मान्य केले. किती द्यायचे हे प्रशासनाने ठरवायला पाहिजेहोते.

मा.आयुक्त : आता लायसन्स देणे बंद केले तर घेतलेल्यांनी दुसऱ्याला ऑक्शन करतील व घरबसल्या पैसे मिळवतील. काही लोक अनधिकृतपणे रस्त्यावर हातगाडया चालवतील.

मा. सभापती : लायसन्स देण्याचा निर्णय सर्वसाधारण सभैने घेतलेला आहे. किती दयायचे हा निर्णय सुध्दा त्याच सभागृहाने घ्यावा. उद्याच्या सर्वसाधारण सभेत हा विषय घ्यावा. निर्णय घेता येईल.

श्री.मो.जवेद मो.इसाक : दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी अदयाप अंतिम झालेली नाही केंव्हा होणार आहे.

प्रकल्प संचालक : यादी पूर्ण होवून भांषातर करण्याचे कामही पूर्ण झालेले आहे. तीन दिवसात मा.जिल्हीाधिकारी यांचे कडे सादर करण्यात येणार आहे. सर्वेचे काम संपलेले आहे.मा.जिल्हाधिकारी हे शासनाकडे पाठवतील त्यानुसार मंजूरी येईल.

श्री.कचरू मोरे : शासनाकडे पाठपूरावा करावा नसता मंजूरी येण्यास वेळ लागेल.

श्री.मधुकर सावंत : जहिरात दिली सर्वे केला परंतू त्यानंतर अशा सूचना केल्या होत्या रिक्षावर लाऊंडस्पिकरवर ,पॉम्प्लेट छापावे जनतेला माहित करावे अशा सूचना दिल्या होत्या तशी कार्यवाही केली नाही. आता वेळ संपलेली आहे. जेराहिलेले आहे त्यांचेसाठी वरील प्रमाणे प्रोसेस करून सर्वे करावा. पूरवणी यादी म्हणून तयार करावी.१५ दिवसाचा आणखी अवधी दयावा.

मा.आयुक्त :दोन वर्षापासून सर्वे चालू असून तीन चार वेळेस वेळ वाढवून दिलेली होती.आता पून्हा जहिरात देवून कार्यवाही केल्यास ज्यांनी अर्जकेला तेही अर्जकरतील पून्हा १० हजर अर्जयेतील प्रोसेस करण्यास उशीर होईल.

प्रकल्प संचालक : मोलकरणीच्या संघटनेने अर्जकेले होते. ८ हजर अर्जआहेत. त्यातील ७ हजर अर्ज निकाली काढलेलेच होते. सर्वेक्षण केले होते पून्हा सर्वेक्षण करावे लागले. जी यादी दिलेली होती सर्वेक्षण झालेल्यांनी पुन्हा अर्जकेल्यामुळे पाठविण्यास सहा महिन्याचा वेळ लागला.

मा. सभापती : सर्वे झालेला असेल तर आणखी वेळ लागल्यास शासनाकडे जण्यासही वेळ लागेल.

श्री.मधुकर सावंत : या महिण्यात माझेकडे १५ ते २० लोक येवू गेले त्याचे नावे यादीत आलेली नाहीत.

मा.सभापती : ज्या लोकांची यात नावे आलेली नसतील त्यांची नावे स. सदस्यांनीउदया पर्यत संबधीत अधिकारी यांचेकडे द्यावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक :महापालिकेच्या शाळेत २०० ते ३०० विद्यार्थी संख्या असेल तर त्या प्रमाणात शिक्षक संख्या त्या शाळेत नाही. किराडपूरा शाळेत ६३४ विदयार्थी संख्या आसून सूध्दा तेथे शिक्षक पूरेसे नाही. कायमस्वरूपी मुख्यध्यापक असणे आवश्यक आह तेथे प्रभारी मुख्याध्यापक काम करीत आहे.

मा. आयुक्त : वर्षाच्या शेवटी जेंव्हा विदयार्थी संख्या विचारात घेतली असता ९ शिक्षक जस्तीचे होत होते. या वर्षी विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे २५ ते ३० शिक्षक कमी पडत आहे. ते भरती करण्यासाठी शासनाची त्या पदांना मान्यता घ्यावी लागेल. त्यासाठी ६ ते ७ महिण्याचा कालावधी जईल. तोपर्यत जे चांगले काम करणारे सेवानिवृत्त शिक्षक आहे त्यांना घेण्याचे सभेपूढे प्रस्तावित करीत आहे.

श्री.संजय जेशी : दोन तीन सर्वसाधारण सभेच्या पूर्वी जस्तीचे शिक्षक होतात म्हणून ठराव आलेला होता त्यावेळी कदाचित संख्या वाढेल असे धोरण प्रशासनाने समोर का ठेवले नाही.

मा. आयुक्त : ३० सप्टेंबर रोजी विदयार्थी संख्या किती आहे त्यानूसार ४० विदयार्थ्यासाठी एक शिक्षक याप्रमाणे मागिल वर्षी ९ शिक्षक जस्तीचे होत होते. जस्तीचे झाल्यास जिल्हा परीषदेकडे पाठविले जते जिल्हा परीषदेत जस्तीचे झाले तर महापालिकेकडे येवू शकतात. शासनाची पदास मंजूरी येण्यास उशीर लागेल किंवा जिप. कडे जस्तीचे

शिक्षक असतील तर ते देतील परंतू जे पर्यत शासनाची मान्यता येत नाही तोपर्यत मधल्या काळासाठी सेवानिवृत्त शिक्षक त्यांचे सेवानिवृत्तीच्या वेळेस जे पेन्शन मिळत होते तेवढा पगार त्यांना दिला जईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : युनायटेड वेस्टर्न बँकेला जगा दिली त्या संदर्भात महानगरपालिकेचे ३० लाखाचे नुकसान झालेले आहे. युनायटेड वेस्टर्न बँकचा व महानगरपालिकेचा करारनामा होता. आता ही बँक अस्तित्वात नाही.आयडीबीआय बँक झाली.त्या ठिकाणी दुसरी बँक येणार असेल तर सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे अपेक्षीत होते. जे करारनामा झाला तोही २० रू. स्टॅम्प पेपरवर झालेला आहे. ते रजिस्टर्ड नाही ते असणे आवश्यक आहे काय याचा खूलासा करावा.

प्र.मालमत्ता अधि. : युनायटेड वेस्टर्न बॅकेला १९९३ मध्ये जगा भाड्याने दिलेली होती. रजिस्टर्ड केलेले नाही.

विधी सल्लागार : दोन प्रकारचे अग्रीमेन्ट असते. जर रक्कम १००रू. पेक्षा जस्त असेल तर रजिस्टर्ड असायला पाहिजे, नसेल तर नाही.

मा. आयुक्त : १९९३ चे अग्रीमेंट आहे. ते रजिस्टर्ड असायला पाहिजे की नाही दोन दिवसात माहिती घ्यावी. जर रजिस्ट्रेशन कंम्पलसरी असेल तर मालमत्ता विभागाने एक आठवडयाच्या आत रजिस्ट्रेशन करून घ्यावे.

श्री.संजय शिरसाट : अग्रीमेंन्ट युनायटेड वेस्टर्न बॅाकेशी झालेले आहे तेथे आयडीबीआय बँक आलेली आहे रजिस्टर्ड कसे करणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : युनायटेड वेस्टर्न बँकेशी करारनामा केलेला आहे. आयडीबीआय बँकेशी करू ही शकत नाही.

मा. आयुक्त :जेंव्हा आयडीबीआय बँकेत कोणतेही बँक मर्ज होते त्यावेळी त्यांनी जितके करार केलेले आहे. जेवढे कर्जदिलेले आहे जेवढे सेव्हिंग ठेवलेले आहे ते आपोआप लिगली ट्रान्सफर होतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सहा महिण्यापासून आयडीबीआय बँक कार्यान्वित झालेली आहे. पॉलीसी मॅटर आहे सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक होते.का घेतलेली नाही.१९९३ अग्रीमेन्ट केले. २००३ मध्ये लॅप्स् झाले. त्यास पाच वर्ष होत आहे अधिकाऱ्यानी याची दखल घेतली नाही. ३० लक्षचे यात नूकसान झालेले आहे. इमारतीच्या आवारात ४०० स्क्वेअर फुट जगा कॅन्टीनला देण्यासाठी १६००० दहा महा भाडेची आजच्या रेट प्रमाणे आपण मागणी करीत आहे. करारनाम्यानूसार बॅकेला १०२२ क्वेअर फुट जगा आहे. तसेच बॅकेच्या आसपास ३००० स्क्वे.फुट जगा असून यामागे कुणाचा हात आहे.करारनामा संपवून पाच वर्ष होत आहे, भाडे ५५०० पूर्वीचे आकारले जत आहे. खुल्या कॅन्टीनसाठी ४०० क्वेअर फुट जगा देण्यासाठी १६ हजरची मागणी करीत असेल तर बँकेला दिलेल्या जगेचा भाडे किमान १ लक्ष पेक्षा जस्त आजच्या दराने आकारणी होणे गरजेचे आहे. २००३ ला करारनामा मुदत संपल्यानंतर पून्हा भाडे ठरवून कार्यवाही करावयास पाहिजे होती केली नाही. या कालावधीत महापालिकेचे ३० लक्षचे नुकसान झालेले आहे सन २००३ पासून जे जे मालमत्ता अधिकारी कार्यरत होते त्यांचे पगारातून महापालिकेचे झालेले नुकसान भरणा करून घेण्यात यावे.करारनामा संपल्यानंतर ७२ तासाची नोंटीस देवून जगा रिकामी करून घेवू शकत होतो.करारनामा युनायटेड बँकेशी झालेला होता.

| | |
|---|---|
| मा. आयुक्त | : महापालिकेने युनायटेड वेस्टर्न बँकेकडून २८ कोटीचे कर्ज घेतलेले आहे. आता आयडीबीसी बँकेकडे भरणा करावे लागतील. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : दुसरी बँक ५६ कोटीचे ८ टक्के दराने कर्जदेईल व १.५०लक्ष दरमहा भाडे ही देवू शकेल. |
| मा. आयुक्त | : ८ टक्के दराने दुसरी बँक कर्ज देत असेल तर विचार केला जईल. नवीन रेन्ट कॅल्क्यूलेशन करून जे काही मधल्या काळात गॅप पडलेला आहे त्याचे वसूलीच्या सहीत प्रपोजल पूढील स्थायी समिती समोर ठैवले जईल. |
| श्री.संजय जेशी | : प्रशासन व पदाधिकारी यांनी एकत्रित बसून महानगरपालिकेचा फायदयाचे होईल असा निर्णय घ्यावा. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : सन २००३ पासून करारनामा केला नाही नवीन रेन्ट नूसार महानगरपालिकेचा फायदा झाला असता जवळपा २५ ते ३० लक्षचे नुकसान केले जे दोषी असेल त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. |
| मा. आयुक्त | : सविस्तर प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत ठेवला जईल. सभागृहाने निर्णय घ्यावा निष्काळजीपणा झालेला आहे. स्थायी समिती, सर्वसाधारण सभा ठरवेल. |
| श्री.मो.जवेद मो.इसाक | : सन २००३ मध्ये जे मालमत्ताअधिकारी होते त्यानी पुढील करारनामा का केला नाही त्यांचेवर कार्यवाही करावी जे ३० लक्षचे नुकसान झाले त्यांचेकडून वसूल करावे नसता त्यांना निलंबीत करावे. |
| मा. सभापती | : येणाऱ्या स्थायी समितीमध्ये या संदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.संजय जेशी | : मागिल बैठकीत मी मुद्दा मांडला होता जकात अभिकर्ता यांनी शासनाची मुद्रांक शुल्क भरणा केले की नाही तसेच जे करारनामा केला तो रजिस्टर्ड आहे की नाही याचा खुलासा या बैठकीत देणार होते. |
| मा. आयुक्त | : ३४ ते ३५ लक्ष भरणा करण्याची रजिस्ट्री कार्यालयाकडून नोटीस आलेली आहे जकात अभिकर्ता यांनी सात दिवसात पैसे नियमानूसार भरावे म्हणून नोटीस काढलेली आहे.लिगली बॉयडींग आहे. त्यामूळे भरावे लागतील. |
| श्री.संजय जेशी | : जे करारनामा केला तो लिगली रजिस्टर्ड नाही त्यामूळे जी रक्कम भरणा करायची ती महापालिकेला देय होते का? लिगली बायंडींग आहे का एवढा वेळ कशासाठी लागलेला आहे. |
| विधी सल्लागार | : करारनामा झालेला रजिस्टर्ड नाही तो रजिस्टर्ड असणे गरजेचे होते जरी नसेल तरी महापालिका स्पेसीफिक परफॉर्मन्स ॲक्ट खाली करारनामा कन्टीन्यू करण्यामध्ये काही अडचण आली तर त्यांचे विरूध्द ॲक्शन घेवू शकतो. |
| श्री.संजय जेशी | : शासनाची लिगल फिस भरणे आवश्यक आहे. २० किंवा १०० रू. स्टॅम्प पेपरवर एखादया घराचा खरेदीखत झाले तर ते अधिकृत धरले जत नाही परंतू शासनाची ४टक्के मुद्रांक शुल्क भरणा केल्या वर ते घर अधिकृत आहे असे समजले जते.जकातचा करारमाना करतांना अधिकृत न करता ११००/-रू. स्टॅम्प पेपरवर का करण्यात आलेले आहे. अशाच प्रकरणात अहमदनगर महानगरपालिकेला शासनाची नोटीस आलेली आहे. |

मा. आयुक्त : महापालिकेला नोटीस आलेली असून संबधीत ठेकेदार यांना महानगरपालिकेने पैसे भरावे म्हणून नोटीस बजवलेली आहे.नियमानूसार बरोबर नाही असे संबधीताचे म्हणणे आहे अगोदर पैसे भरणा करावे व नंतर अपील करावे असे म्हटले आहे.

श्री.संजय जेशी : ठेकेदार मुद्रांक शुल्क भरेल किंवा न भरेल आता मुद्रांक शुल्क न भरता करारनामा करू शकतो का ? अधिकृत करारनामा का करण्यात आलेला नाही.

मा. आयुक्त : जे करारनामा केला तो लिगली बॉयडींग आहे. आतापर्यत ५० ते ६० वेळा सर्व महानगरपालिका मिळून खाजगीकरण केले असेल कोणत्याही महानगरपालिकेने रजिस्टर्ड केलेले नाही. आता मुद्दा काढलेला आहे की रजिस्ट्रेशनसाठी ३३ लक्ष भरावे संबधीत ठेकेदाराने रजिस्ट्री कार्यालयात सात दिवसात रक्कम भरावी म्हणून नोटीस दिलेली आहे.

श्री.संजय जेशी :शासनाचे मुंद्रांक शुल्क भरणा केले नाही झालेला करारनामा अधिकृत आहे की नाही.शासनाची फिस न भरणा करता हे सर्व व्यवहार होत असेल तर ज्यांनी बॉण्डवर घर घेतले ते अधिकृत होवू शकते का याचाही खुलासा करावा. प्रशासनाला संबधीत एजन्सीला ३४ लक्षचा फायदा करून दयायचा होता.झालेला करारनामा अधिकृत आहे की नाही.

विधी सल्लागार :अनधिकृत आहे असे म्हणता येणार नाही.

श्री.संजय जेशी : प्रशासनाने संबधीत एजन्सीला आजपर्यत ३२ लक्ष भरण्याची सूट दिली. हा विनोदाचा विषय नाही. इतर महानगरपालिकेत काय झाले असेल ते विसरून जवे. नगररचना विभागाने यापूर्वी नियमबाहय परवानगी दिली म्हणून आजही दयावी असे नाही. प्रशासन सभागृहाला सत्य उत्तर देवू शकत नाही हे दुर्दैव आहे.

विधी सल्लागार : हा करारनामा अधिकृत आहे कारण करारनामा मध्ये दोन भाग आहेत. अग्रीमेन्ट आणि कॉन्ट्रक्ट सर्व बाबी त्यात येतात तेंव्हा तो बंधनकारक असतो. यात एक भाग असा की व्हॅल्यू जी असते ती रजिस्टर्ड न केल्यामूळे विक होते. परंतू मा. न्यायालयासमोर हे प्रकरण गेले तर मा. न्यायालय सुध्दा मान्य करू शकेल की हा करारनामा आहे.

श्री.संजय सिरसाट : मा. न्यायालय काय निर्णय देईल हे मत मांडण्याचा अधिकार विधी सल्लागार यांना नाही.

मा. सभापती : लिगली करारनामा करून घ्यावा असे सदस्यांचे मत आहे.

मा. आयुक्त : १५ दिवसात या संबधीत कार्यवाही करण्यात येईल.सदर अधिकृत बायडींग करारनामा आहे.

श्री.संजय जेशी : ११०० रू. च्या स्टॅम्पवर लिगली होवू शकत नाही. प्रशासन म्हणते म्हणून मान्य करणे योग्य नाही. दुसरे आयुक्त येतील संबधीत ठेकेदार ठेका सोडून गेले तर प्रशासनाला काय कार्यवाही करता येईल.सदर करारनामा लिगली नाही हे प्रशासनाने मान्य करावे व लिगली करारनामा करून घ्यावा.

मा. आयुक्त :मा. सर्वोच्च न्यायालयाचे एक निकाल आहे की जर रजिस्टर्ड नसेल तर त्या ॲग्रीमेंन्टच्या फर्दरन्स मध्ये पाच १० रू. व्यवहार झाला असेल तर त्यास लिगली करावे लागते.गुंठेवारीत लिगल पजेशन सिध्द करू शकतो परंतू ओनरशिप सिध्द करू शकत नाही. जकात मध्ये अग्रीमेंन्टच्या फर्दरन्समध्ये व्यवहार झालेले आहे. १० कोटी अलग सेक्यूरीटी म्हणून जमा केलेले आहे. अधिकृत करारनामा आहे.

कोणतीही अडचण नाही. विधी सल्लागार यांनीही लिगल म्हटले आहे. रजिस्ट्री कार्यालयाकडून पैसे भरावे म्हणून पत्र आले त्यानूसार संबधीत ठेकेदारास सात दिवसात पैसे भरण्याची नोटीस दिलेली आहे ते पैसे भरतील नसता रजिस्ट्री ऑफिसला पत्र विड्रॉल करण्या संदर्भात कार्यवाही करतील तसे आदेश आणतील नसता ३३ लक्ष भरतील. जर ठैकेदाराने पैसे भरणा केले नाही तर जे१० कोटी सुरक्षा ठेव आहे त्यातून महापालिका भरणा करील.

श्री.संजय जेशी : १००रू. रक्कमेच्या वर करारनामा करायचा असेल तर ते रजिस्टर्ड करणे गरजेचे असते असे विधी सल्लागार यांनी म्हटले. संबधीत ठैकेदाराकडून अडंर प्रोटेस्ट रक्कम उदयाच महानगरपालिकेकडे भरून घ्यावी.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सूचनाची प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

श्री.संजय सिरसाट : जेई तसेच दुय्यम अवेक्षक यांना निवडणूकीच्या कामासाठी दिले परंतू बजेट मध्ये विकास कामासाठी जी तरतूद केली त्यांचे अंदाजपत्रक कोण तयार करणार आहे. सदर लिपीकाचे कामासाठी टेक्नीकल कर्मचारी का पाठविले.

मा. आयुक्त : कर्मचाऱ्याची यादी दिली जते. आदेश संबधीत विभागाकडून काढले जते तरी सूध्दा कामासाची निकड लक्षात घेता जेई यांचे जगी दुसरे कर्मचारी देण्यासंबधी मी चर्चा केलेली आहे. नाव दिल्यानंतर दुसरे आदेश काढले जतील.

श्री.संजय सिरसाट :जेई दुय्यम अवेक्षक यांना तात्काळ बोलवून घ्यावे. वार्डातील विकास कामे झाली पाहिजे

मा.आयुक्त : महापालिकेचे २०० कर्मचारी आहे. येत्या २४ तारखेपर्यत काम दिलेले आहे. तरी पण जेई आणि दुय्यम अवेक्षक यांना परत बोलविले जईल. त्यांचे जगेवर दुसरे कर्मचारी पाठविण्यात येतील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सन २००४-०५ मध्ये महानगरपालिकेला वाहन प्रवेश फिस ५ कोटी वसूल झाले. सन २००५-०६ मध्ये ४.५४ कोटी वसूल झाले. सन २००६-७ मध्ये ही ४.५४ कोटी वसूल झाले. आता५० ऐवजी १००रू. घेण्यात येत आहे. याचा अर्थ ठेकेदार यांना ११ कोटी वसूली होतील. मागिल वर्षापेक्षा ६ कोटी जस्त येतील. मागिल वर्षी १०१ कोटीमध्ये जकात वसूलीचा ठैका दिला. मागिल वर्षी जी वसूली झाली त्यांचे १०,१५,२० टक्के नैसर्गीक वाढ करून ठेका दिला जतो. १०१ कोटीचा मागिल वर्षी ठैका दिला होता या वर्षी १११कोटीत ठेका दिला १० कोटी वाढवून घेतले. परंतू वाहन प्रवेश फिस पोटी पाच कोटी ऐवजे ११ कोटी संबधीत ठैकेदारास मिळणार आहे.

श्री.संजय सिरसाट : नेहमी जकात विषयावर चर्चा होते. १११ कोटीचा करारनामा केला. प्रशासनाची जरी चूक झाली असेल तरी स्वत: आयुक्त त्यांचेवर कार्यवाही करणार नाही. त्यासाठी स. सदस्य हे सत्ताधारी पक्षाचे आहे या बाबतीत शासनाकडे म्हणणे मांडावे. योग्य तो निर्णय घेवून यावा. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल.

श्री.अ.साजेद.अ.सत्तार : वाहन प्रवेश फिस पोटी सहाकोटी जस्तीचे जेयेत आहे ते महानगरपालिकेचे उत्पन्न आहे ठेकेदारास मिळणार आहे ते महापालिकेला त्यांनी भरावे जेटारगेट दिले आहे ते कमी दिलेले असून चूकीचे दिले आहे.

मा.आयुक्त : जकातीचे खाजगीकरण झाले त्या संदर्भात या सभागृहात चर्चा होवूनच निर्णय झालेला आहे. जेंव्हा पहिल्या वर्षी खाजगीकरण केले जते त्यावेळी १० टक्के नैसर्गीक

वाढ तसेच जकात चोरी वगैरे होत असेल असे मिळून २० टक्केने टारगेट वाढवतो. मागिल वर्षी २० टक्केची वाढ करून टेंडर काढले होते. प्रथम वर्षी जकात खाजगीकरण केले जते शासनाचे महानगरपालिकेसाठी डायरेक्शन नाही. नगरपालिकेसाठी आहे. प्रशासनाने टारगेट ठेवले स्थायी समितीने मान्यता दिली आता सहा कोटीने कमी टारगेट दिले असे म्हणणे बरोबर नाही.

श्री.संजय शिरसाट : जकातीचे खाजगीकरण केले करारामा केला चर्चा करून माहिती घेण्यास अर्थ नाही.

मा. आयुक्त :करारनामा करण्यापूर्वी स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मागिल वर्षी २५ टक्केने टारगेट वाढवून दिले या वर्षी ४ टक्केनी वाढविले की जस्त वाढविले.

मा.आयुक्त : मागिल वर्षीही असा निर्णय आपण घेतला होता की जर शासनाने ५० रू. ऐवजी १००रू. ट्रांझीट फी घेण्यास मान्यता दिली तर नसती तर निविदा १०६ कोटीपर्यंत गेले असते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मार्च मध्ये करारनामा झाला त्यावेळी शासनाने फिस वाढ केलेली नव्हती त्यानंतर मान्यता आलेली आहे. एक एप्रिल पासून जकात वसूली सुरूवात झाली. यात सहा कोटीने टारगेट कमी आलेले आहे ठेकेदाराचा फायदा झालेलाआहे.

श्री.वसंत नरवडे : मागिल वर्षी २५ टक्केनी टारगेट जस्त ठेवले होते त्यामुळे १०१ कोटीमध्ये ठेका दिला. या वर्षीसाठी खाजगीकरण केलेले आहे. १०% टारगेट वाढवून दिले.

श्री.अ.रशिद खॉन : मोतीबिंदूचे ऑपरेशन पूर्वी घाटी दवाखान्यातच करीत असे. आता किती ठिकाणी केले जत आहे याचा खूलासा द्यावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी : यात वैद्यकीय महाविदयालय व्यतिरिक्त एमजीएम हॉस्पीटल तसेच लायन्स हॉस्पीटल ऑपरेशन साठी निवडलेले आहे.

श्री.अ.रशिद खॉन :१० वर्षापासून घाटी दवाखान्यात ऑपरेशन होत आहे. एक महिण्याला जवळपास ३ ते ४ हजर ऑपरेशन होतात इतर ठिकाणी ८ ते १० ऑपरेशन होतात. महानगरपालिकेने घाटी दवाखान्यासाठी २० लक्षचे खाट दिले. रस्त्याच्या कामावर खर्च केले. असे असतांना आणखी दोन ठिकाणी केंद्र ठेवण्याची गरज नव्हती. कूणाच्या सांगण्यावरून किंवा कुणाला खुश करण्यासाठी असे करणे योग्य वाटत नाही. स्थायी समिती किंवासर्वसाधारण सभेची मान्यता सूध्दा घेतलेली नाही.

मा.आयुक्त : स्लम भागातील लोक ऑपरेशनसाठी पात्र असतांनाही करीत नाही. महापालिका स्थापन होवून २५ वर्ष होत आहे वर्धापन दिना निमित्ताने असा निर्णय घेतलाकी या शहरात जेवढेही लोक मोतीबिंदूचे ऑपरेशनसाठी पात्र आहेत अशा सर्वाचे ऑपरेशन करण्याचा ध्यास आहे. यासाठी पाच ते सहा हॉस्पीटलचे प्रतिनिधी यांना बोलविले होते. घाटी दवाखाना, धुत, बजज, हेडगेवार, एमजीएम तसेच लायन्स हॉस्पीटलचे प्रतिनिधी बोलविले होते. त्यावेळी विचारणा केली की कमीत कमी खर्चात जस्तीत जस्त किती ऑपरेशन करू शकतात. सर्वात कमी दराने एमजीएम तसेच लायन्स यांनी मान्य केले. ७५०रू. एक ऑपरेशन करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यात केंद्र शासनाकडून प्रत्येक ऑपरेशनसाठी ६८५रू. मिळणार आहे. जिल्हाधिकारी यांचे कडे डिस्ट्रीक्ट ब्लाइंट कंट्रोल सोसायटी आहे. त्यांचे मार्फत १५ ते १६ लक्ष रूपये मिळतील. पूर्ण शहरासाठी चार ठिकाणचे हॉस्पीटल मिळतील अशी अपेक्षा होती परंतू घाटी सह दोनच कमी दराने करण्यास तयार आहेत. जे

ऑपरेशन करू इच्छितात त्यांना प्रथमत: त्यांचे निवडीनुसार त्या त्या ठिकाणी देणार आहोत. सर्वाना दुर जण्याची गरज पडणार नाही याचा विचार करून तीन सेंन्टर ठेवलेले आहे. प्रत्येक ऑपरेशनमागे ६८५रू. मिळणार आहे. यात १०० ते १५० रू. तुर्त खर्च जेकी १ ते १.५० लक्ष रू. खर्च करावे लागतील.

श्री.अ.रशिद खॉन : सुविधा घाटी दवाखान्यास देत आहे. कुणाच्या सांगण्यावरून करणे योग्य नाही घाटी दवाखान्यात ऑपरेशनसाठी एवढा खर्च लागत नाही. इतर उपचारासाठी संपूर्ण स्लम भागातील लोक घाटीमध्ये येतात. कुणासही दूर पडत नाही. उलट सवलत मिळत आहे. परंतू कूणाच्या सांगण्यावरून होत असेल तर योग्य नाही.या दवाखान्यात कूणीही रूग्ण नाही. तसेच जर रूग्णाचे नुकसान इज पोहचल्यास कोण जबाबदार असणार आहे.

मा.सभापती :प्रथमत: घाटी दवाखान्यास प्राधान्य दयावे त्यानंतर इतर दवाखान्यास प्राधान्य देण्यात यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : दोन तासापासून चर्चा होत आहे. चर्चा होते परंतू प्रशासन त्याकडे गार्भीर्याने लक्ष देत नाही सन २००५ पासून मी उस्मानपूरा मुथीयान कॉर्नर येथील डी. पी. रस्त्यामध्ये श्री. घोरपडे यांची १२०० क्वेअर फुट जमीन गेलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे.परंतू त्यांनी महानगरपालिकेची दिशाभूल केलेली आहे कारण एकीकडे ते जगेचा मोबदला घेत आहे तर एकीकडे मी मोबदला घेतला नाही म्हणून महानगरपालिकेची जगा घेतली आहे. सदर व्यक्ती यांनीजगेचा मोबदला घेतलेला आहे किंवा काय म्हणून १४.१२.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात लेखा विभागाकडे माहिती मागविली होती त्यानूसार ९.७.२००७रोजी मला माहिती देण्यात आली. ९२८५ हा जगेचा मोबदला दिल्याचा धनादेश क्रमांक असून. १,८२,६१०रू.त्यानी मोबदला घेतलेला आहे. एकीकडे मोबदला दिला जतो तसेच जगाही दिली जते. हे नियमाने बरोबर आहे काय याचा खूलासा करावा. सदर व्यक्तीने महानगरपालिकेच्या जगेला संरक्षित भिंत पाडून राजरोशपणे बांधकाम सुरू केलेले आहे. याची कल्पना देवूनही कार्यवाही झालेली नाही. सदर अतिक्रमण काढणार की नाही. तसेच संबधीत व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करणार की नाही.याचाही विचार करावा. (माहितीची प्रत मा. सभापती तसेच मा. आयुक्त यांचेकडे सादर करतात. )

मा. आयुक्त : या प्रकरणाची संचिका मागविण्यात येत आहे. नंतर खूलासा करण्यात येईल.

मा. सभापती : तोपर्यत दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : सभागृहात विविध प्रश्नावर चर्चा होते. कार्यवाही करण्याचेआदेशीत केले जते जे जे मुद्ये मांडले आहेत त्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. स. सदस्य श्री. संजयजेशी यांनी मागिल बैठकीत जकात संबधीचा तसेच स.सदस्य श्री.हिम्मतराव दाभाडे तीन वर्षापासून श्री.घोरपडे नावाच्या व्यक्तीच्या संदर्भात मुद्दा मांडतात अद्याप कार्यवाही झालेली नाही. गेल्या चार वर्षापासून सिडको हस्तांतरण होणार म्हणून कार्यवाही चालू होती त्यामूळे सिडकोने सुध्दा गेल्या चार वर्षात विकासाची कामे या भागात केलेली नाही. एक वर्षापासून सिडको हस्तांतरण झाले. जे सेवा कर सिडको घेत असे त्यात दैनदिंन सेवा सुरळीतपणे देत असे परंतू हस्तांतरण केले हस्तांतरणापोटी सिडकोने १५ कोटी तसेच शासनाने २५ कोटी असे एकूण ४०

कोटी महापालिकेस मिळालेले आहे.सिडको ज्या सेवा सुविधा देत असेल त्या सूध्दा महापालिका देण्यास कमी पडत आहे अशी परीस्थिती झालेली आहे. सिडको ही प्लॅनींग केलेली वसाहत आहे. परंतू गेल्या वर्षभरात सिडको भागात १८,२१,२४ मी. रूंद रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले असून चालणे अवघड झालेले आहे.अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत नाही. त्यामूळे सिडकोतील नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. नागरीक नगरसेवकांकडे येवून तक्रारी करतात. सिडको ही प्लॅनींग सिटी असून ज्या ज्या लोकांनी घरांचे बांधकाम केलेले आहे ते नियमानुसार केलेले असून सर्व रेकॉर्ड सिडको कडे आहे त्यानूसार घराच्या बांधकामात कोणताही बदल नाही. त्यामूळे आहे त्या रेकॉर्ड प्रमाणे सिडकोच्या माध्यमातून नोटीसेस दिल्या असत्या तर नागरीक कर भरणा करण्यास पूढे आले असते. परंतू स्पेक एजन्सीला सर्वेचे काम देवून जेथे सेवा कर १०००/-रू. होता त्या ठिकाणी ९०००/-रू.पर्यत नोटीसेस दिलेल्या आहे.हे योग्य नाही. महापालिकेकडे हस्तांतर केल्यामूळे आणखी त्रासदायक वाटत आहे.ही चौथी सभा आहे सिडकोतील अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात कोणतीही कार्यवाहीं झालेली नाही.

श्री.हिम्मतरावदाभाडे : अनेक वेळा स्थायी समितीच्या बैठकीत अतिक्रमणाचा मुद्या मांडला कार्यवाही झालेली नाही. एकनाथनगर रस्त्यावर डी. पी जवळ एका व्यक्तीने १०×१० टपरी टाकलेली आहे अनेक वेळा निदर्शनास आणून दिले काही लोकाच्या दबावाखाली कार्यवाही केली जत नाही.अधिकारी दबावाखाली काम करीत असेल तर योग्य नाही. जर वार्ड अधिकारी अतिक्रमण हटविण्यास सक्षम नसतील तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : वार्ड अधिकारी यांना अधिकार दिले परंतू अतिक्रमण काढण्याची कार्यवाही त्यांचे कडून होत नाही.

मा. आयुक्त : एकत्रिकरण करण्याची मागणी झालेली आहे. त्याची कार्यवाही दोन दिवसात होईल.

श्री.संजय जेशी : वार्ड वाईजअधिकारदिले परंतू त्या कार्यवाहीसाठी पूरेसा कर्मचारीवर्ग दिलेला नाही. एकच वाहन व एक एक वार्ड कार्यालयाकडे पाठविल्यास १० ते १५ दिवसाचा कालावधी लागेल. एकत्रिकरण केले तरी आणखी अतिक्रमणासाठी वाहन तसेच कर्मचारी वाढवून दयावे. जे पूर्वी या विभागात कर्मचारी होते त्यांची नियुक्ती करू नये.

मा. आयुक्त : सेन्ट्रलाईजकरण्याची कार्यवाही दोन दिवसात होईल.

मा. सभापती : दोन फिरते पथक कार्यान्वित करून त्यासाठी लाणारा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्याची कार्यवाही करावी. तसेच एकनाथनगर भागातील अतिक्रमण दोन दिवसात काढण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : माझ्या वार्डातील फुटपॉथचे काम तीन महिण्यापासून थांबलेले आहे.

मा. आयुक्त : या ठिकाणी १० ते ११ लोक आहेतत्यापैकी एक दोन लोकांच्या घरासमोर ग्रीनरी करून ठेवलेली आहे. यापूर्वी जेंव्हा सिडकोचे कर्मचारी काढण्यासाठी गेले त्यावेळी विरोध झाला तेथील लोक सिडकोचें प्रशासन यांचेकडे गेले होते. त्यावेळी सिडकोचे प्रशासन यांनी असे म्हटले होते की ग्रीनरी जी आहे ती चांगली दिसते काढली नाही. आता तेथे महापालिका फुटपॉथचे काम करीत आहे. महापालिकेचे अधिकारी तेथे

गेले होते. ती चांगली दिसते परंतू महापालिकमेच्या इमेजवर येत असेल व प्रशासन भेदभाव करते असे लोकांना वाटत असेल तर काढून घेण्याचे सूचना दिलेल्या आहेत. पूर्णपणे काढून घेण्यात येईल तसेच सिडको भागात जेब्लॅकटॉप आहे त्यास सोडून बाजूला मोठे शोल्डर असते. त्यात कचरा दिसून येतो.ते फारच मोठे पण आहेत. कमीत कमी १.२ ते १.३ मीटरचे फुटपॉथ करणार आहे. त्यानंतर आपणास ग्रीनरी करता येईल.

श्रीमती जयश्री किवळेकर : जेव्हा सिडकोने कार्यवाही केली त्यावेळी अतिक्रमण काढत होते. परंतू आता त्या ठिकाणी विकास काम करणार आहोत. काढणे आवश्यक आहे. सदर व्यक्तीने १२ फुट वाढलेले आहे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी स्वत: पाहणी करून कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :क्रांतीचौक ते बाबा पेट्रोलपंप पर्यत फुटपॉथ केले परंतू लोकांनी त्यावर अतिक्रमण केले मा. न्यायालयासमोर मोठया प्रमाणात अतिक्रमण केले लोकांना पायी चालता येत नाही.अतिक्रमण काढल्यानंतर पून्हा लोक दुकाने थाटून बसलेली आहेत.कार्यवाही करणार नसेल तर फुटपॉथवर खर्च करून उपयोग नाही.

मा.सभापती : भ रारी पथक नियुक्त करून कार्यवाही करावी.

मा. आयुक्त :ज्या ज्या रस्त्यावर लोक व्यवसाय करतात काढले तरी दोन दिवसात येवून बसतात अशा ठिकाणी भरारी पथकामार्फत कार्यवाही केली जईल.

श्री.मोहन मेघावाले : हडको भागातील साफसफाईचे काम खाजगी एजन्सीला श्री. खरे नावाचे व्यक्तीला दिलेले आहे  वार्ड अधिकारी हे एजन्सीच्या दबावाखाली येवून काम करतात. साफसफाईचे कामव्यवस्थीत होत नाही. आम्ही आयुक्ताबरोबर एकत्र बसतो उठतो एका बरोबर  जेवण करतो. असे एजन्सीचे मालक सांगतात.तसेच औषध फवारणीचे काम ही होत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एखादी एजन्सी महापालिका प्रशासनाची बदनामी करीत असेल तर कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : कोणती एजन्सी येईल त्याचे आपण ऐकून मत मांडणे बरोबर नाही.लोक प्रतिनिधीनी प्रशासनावर विश्वास ठेवावा एजन्सीवर नाही.

श्री.मोहन मेघावाले : श्री. खरे यांनी साफसफाईचा ठेका घेतलेला आहे. साफसफाई होत नाही.वार्ड अधिकारी श्री.सुर्यवंशी सुचना करूनही कार्यवाही होत नाही.वार्ड अधिकारी हे एजन्सीच्या दबावाखाली काम करतात.एजन्सी मालक व आयुक्त बरोबर जेवतात अशी नागरीकामध्ये चर्चा आहे.

मा. आयुक्त : प्रेशरखाली काम करीत असेल तर त्या वार्ड अधिकारी यांना पदावनत केले जईल. आयुक्त एजन्सी मालका बरोबर जेवतात हे कोणी सांगीतले. ज्यांनी म्हटले असेल त्यांचे नाव द्यावे, तोपर्यंत आयुक्त म्हणून स्थायी समितीमध्ये कोणताही खुलासा करणार नाही.

श्री.मोहन मेघावाले : एजन्सीमुळे वार्ड अधिकारी व आयुक्तांची तसेच नगरसेवकांची बदनामी करीत आहे.साफसफाई होत नाही.नगरसेवक पैसे घेतात म्हणून काम होत नाही अशी बदनामी होत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एजन्सी प्रशासनाची बदनामी करीत असेल तर कार्यवाही करावी.

मा.सभापती : वैयक्तीक स्वरूपाचे आरोप कोणी करू नयेत. वार्ड अधिकारी काम करीत नसेल तर पदाधिकारी आयुक्तांकडे तक्रार करू शकतात. कार्यवाही करता येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री. खरे यांचे एजन्सीमुळे प्रशासनाची बदनामी होत असेल तर एजन्सीचा ठेका रद्द करावा.

श्रीमती जयश्री किवळेकर : वैयक्तीक मा.आयुक्तांवर कुणी आरोप करीत नाही. जे एजन्सी काम करते त्यावर प्रशासनाचे लक्ष नाही असे मत मांडलेले आहे.

मा. आयुक्त :ठेका रद्द करायचा असेल तर तसा ठराव घ्यावा कार्यवाही केली जईल.

श्री.अ.रशिद खॉन : संबधीत ठेकेदार बोलले किंवा काय याची शहानिशा करावी.

मा.आयुक्त : स्थायी समितीमध्ये संबधीतास बोलवून घ्यावे विचारणा करावी. सत्य परीस्थिती समोर येईल.

श्री.साजेद अ.सत्तार : एखादया एजन्सीला ठेका दिला म्हणून मा. आयुक्तांची त्यांनी बदनामी करावी असे अधिकार दिलेले नाही.

मा.आयुक्त :सिडको भागासाठी तीन महिण्याकरीता एजन्सी नियुक्ती केलेली आहे. कचरा वाहतूकीसाठी खाजगीकरण करण्याचा आपण निर्णय घेतलेला होता. जे वाहने महानगरपालिकेकडे कचरा वाहून नेण्यासाठी आहेत ती जुनी झालेली आहे.कचरा जमा करून घेवून जण्यासाठी वाहनावर जवळपास ३०० च्या वर कर्मचारी आहेत. कचरा वाहतुकीचे खाजगीकरण केले तर महानगरपालिकेचे १.५० ते २.०० कोटी रूपयांचा फायदा होणार आहे. सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेला आहे. वार्ड कार्यालय ड किंवा सिडको यापैकी साफसफाईचे केलेले खाजगीकरण रद्द करणार आहोत. सर्वसाधारण सभा यास मान्यता देईल या अपेक्षेने तीन महिण्याची सिडकोसाठी मुदतवाढ दिलेली आहे. वार्ड कार्यालय ड चे खाजगीकरण केलेले सप्टेंबर ऑक्टो. मध्ये मुदत संपत आहे. कचरा वाहतुकीचे खाजगीकरण करण्याचे टेंडर काढल्यानंतर त्याचे कॅल्क्यूलेशन करून किती खाजगीकरण करायचे याचा विचारा करावा लागणार आहे. आजसकाळीच आरोग्य वैद्यकीय अधिकारी माझेकडे आले होते. ज्या ज्या एजन्सीला स्वच्छतेचा ठेका दिला ती एजन्सी चांगली साफसफाई करते की नाही यासाठी प्रत्येक एजन्सीकडे चौकशी तपासणीसाठी विभाग प्रमुखाची नियुक्ती करण्याचे आदेशीत केलेले आहे. तीन दिवसात संबधीत अधिकारी अहवाल माझेकडे देतील. जे एजन्सी चांगले काम करीत नसेल काळया यादीत समावेश केला जईल व त्या भागासाठी रिटेंडर काढले जईल. सात दिवसात तपासणी केली जईल. ज्याचे चांगले काम आहे त्यांना मुदतवाढ दिली जईल वार्ड ड व वार्ड कार्यालय क चे कचरा वाहतुकीसाठी खाजगीकरण केले जईल. मागिल वेळेस ३० टक्के मजूर कर्मचारी कमी होते म्हणून खाजगीकरण केलेले होते.

श्री.हिम्मतराव दाभाडे : नाला सफाईचे काम दिले परंतू सफाई व्यवस्थीत होत नाही. बिल अदा केले जते. उस्मानपूरा पोलीस स्टेशनच्या मागिल नाल्याची सफाई झालेली नाही. तरी सुध्दा सफाई झाल्याचे दाखवून बिल काढण्याची शक्यता आहे. वार्ड कार्यालय फ च्या बाजूलाच एक लेडीज बेअर बार आहे. संबधीताने नाल्याची ३० फुट जगा हडप केलेली आहे. ते अतिक्रमण आहे की नाही. असेल तर केंव्हा काढणार आहे.

मा.सभापती : मा. आयुक्तांनी त्यांचे दालनात बसून या संबधी योग्य तो निर्णय घ्यावा.

**विषय क्र.55 :**

दि. **27/2/2007**(का.प.क्र.22),**13/3/2007** व **20/3/2007**(का.प.क्र.24), **20/3/2007**(का.प.क्र.25), **30/3/2007**(का.प.क्र.26) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सभापती : इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दि. **27/2/2007**(का.प.क्र.22),**13/3/2007** व **20/3/2007**(का.प.क्र.24), **20/3/2007**(का.प.क्र.25), **30/3/2007**(का.प.क्र.26) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 56 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, जनार्थ ही स्वयंसेवी संस्था मे 2006 पासून "अपंग मित्र कक्ष" खालील ठिकाणी चालवत आहे.

1) सिल्कमील कॉलनी रूग्णालय
2) मुकुंदवाडी आरोग्य केंद्र
3) कटकटगेट आरोग्य केंद्र

सीबीआर हे आठवड्यातून प्रत्येक केंद्रात 2 वेळेस भेटी देतात व आसपासच्या भागात सर्वेक्षण/समोपदेशनाचे काम करतात.

जनार्थ ही संस्था "अपंग मित्र कक्ष" चालवत आहे. पुढील इ.स. 2007 ते 2011 पर्यंत या चार वर्षांच्या कालावधीसाठी जनार्थ ह्या संस्थेस 11 "अपंग मित्र कक्ष" म्हणून चालविण्यास (ठरलेल्या अटी-शर्तीस अधीन राहून) देणेस प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुधकर सावंत : या बाबतीत अटी शर्ती काय आहे नमूद केलेले नाही.

आरोग्य वैद्य. अधिकारी :या तीन केंद्रासाठी जेलागणारे साहित्य आहे त्याचेवर खरेदी करण्याची णपरवानगी दिली होती. त्याचे पोटी ९१,९६२/-रू.खर्च म्हणून परतावा दिलेलाआहे. कर्मचाऱ्याचे पगार संस्था करणार आहे. प्रवास भत्ता यासाठी मागिल वर्षी जवळपास १२ हजर खर्च झालेला होता. प्रवास भत्ता फक्त देत आहोत.

मा. आयुक्त : दवाखान्यामधून ज्या सेवा देतो त्यामधून एक सेवा असायला पाहिजे

श्री.संजय जेशी : दवाखाना देणार आहोत त्याअर्थी ते आपोआपच होणार आहे.ही कार्यवाही करून भविष्यात १० लोक कायम सेवेत घ्यावेत असे बोलण्याची कूणाला संधी देवू नये. सहा महिण्यानंतर पून्हा या लोकांना कामावर घेण्याची वेळ येवू देवू नये. ११२४ सारखी चौकशी सुरू होईल.

आरोग्य वैद्य. अधिकारी : अट क्र.५ मध्ये आपण ज्या सेवा देता त्यात याचा समावेश करावा. जे रक्कम देणार आहोत ती कर्मचाऱ्यांना नाही संस्थेला देत आहोत.

मा. आयुक्त : सदर कर्मचारी महापालिकेच्या सेवेत कधीही समावून घेतले जणार नाही असा उल्लेख करावा. जेअपंग मुले येतात त्यांना प्रशिक्षण दयावे लागते. त्यांना मानधन द्यावे लागणार आहे. जेमशीन असते त्यांचे मागिल वर्षी ५० हजर दिलेले होते. तीन थेरपी कार्यकर्त्यांचे मानधन ११ हजर आहे.

श्री.वसंत नरवडे : ११ हजर रू. महिना देणार आहे का?

आरोग्य वैद्य. अधिकारी : एक महिण्यासाठी नव्हे वर्षभरासाठी ती रक्कम आहे.

मा.आयुक्त : प्रत्येक कक्षामध्ये एक थेरीपी करणारे व्यक्ती असेल.तीन लोकांना ११ हजर खर्च प्रवास भत्ता २ हजर दयावा लागणार आहे.

श्री.मधुकर सावंत : गेल्या वर्षी ९१ हजर खर्च दिला स्थायी समितीची मान्यता घेतली होती.

मा. आयुक्त : हे आयुक्तांच्या अधिकारात येते परंतू पाच वर्षासाठी दयायचे म्हणून स्थायी समितीकडे सादर केलेले आहे.

श्री.मधुकर सावंत :मागिल वर्षी सभागृहाची मान्यता न घेता रक्कम दिली. आयुक्तांच्या अधिकारात आहेत तर प्रस्ताव सादर करण्याची गरजनव्हती सर्व रक्कम देवून टाकावी.

मा. आयुक्त :मागिल वर्षी तीन दवाखान्यामध्ये सुरूवात केली होती.

श्री.कचरू मोरे : यातथोडी चूक झालेली आहे. यात २० हजर दाखवले एकूण रक्कम ४० हजर होत आहे. हा ठराव मंजूकरावा जनहिताचा हा प्रस्ताव गरीबाचे मुले येतात त्याचा फायदा होईल.

श्री.मधुकर सावंत : स्थगिती द्यावी.

मा.आयुक्त : मागिल वर्षापासून सूरूवात केली. जे अपंग मूले असतात त्यांना मेडीकल सेवा महापालिकेकडे उपलब्ध नाही. तेवढा खर्च महापालिका करू शकणार नाही म्हणून या मूलासाठी एक कक्ष स्थापन करण्याचे ठरविले. म्हणून संस्थेला मागणी केलेली होती. त्यानुसार जगा व ५० हजरचे इन्स्टूमेंट खरेदी करून दिले. दर वर्षी याची कन्टीन्युटी राहत नाही म्हणून ५ वर्षासाठी कराण्याचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. तीन सेंन्टर करायचे असून महिण्याला खर्च २० हजर असेल ११ हजर मानधन तीन लोकांचे तसेच ६ हजर प्रत्येकी दोन हजर प्रवास भत्ता १ हजर प्रत्येक सेंन्टरसाठी साहित्य द्यावे लागणार आहे.

आरोग्य वैद्य.अधिकारी : व्यायाम करण्याची वेळ ही ९ ते १ राहील.

श्री.संजय जेशी : सविस्तर प्रस्ताव पूढील बैठकीत सादर करावा.

श्री.अ.रशिद खान : या सेंन्टरमध्ये मूले येतील तपासणी कोण करणार आहे.

आरोग्य वैद्य. अधिकारी : मेडीकल ऑफिसर तपासणी करतील.

श्री.अ.रशिद खॉन : कटकट गेट येथे एजन्सीकडे काम दिले चार दिवसापासून कूणीही आलेले नाही.तेथे रजिस्टर ठेवलेले आहेत का. सही करतात का ?

आरोग्य वैद्य. अधिकारी : रजिस्टर ठेवलेले आहे. वैद्यकीय अधिकाऱ्याकडून हजेरी पट आल्याशिवाय त्यांना रक्कम दिली जत नाही.

श्री.संजयजेशी : सुधारीत प्रस्ताव पूढील बैठकीत ठेवावा.

मा. सभापती : विषाय क्र.५६ पुढच्या बैठकीत सविस्तर ठेवावा.

**ठराव :**

सदर प्रस्ताव (विषय क्र.56) पुढच्या बैठकीत सविस्तर ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 57 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपा हर्सुल आरोग्य केंद्राची इमारत अत्यंत दुरावस्थेत व रूग्ण आणि केंद्रात कार्य करणाऱ्यांच्या जिवितास धोकादायक आहे.

मा.स्थायी समिती सभा दि.14/2/2006 विषय क्र.223 नुसार हर्सुल येथील सौ.उषा मोतीलाल उबाळे यांची इमारत रू.1493/- प्रतिमाह भाडे तत्वावर घेण्यास व इमारतीचे विद्युत देयक संबंधीत घरमालकाने भरण्यास मंजुरी दिलेली आहे.

दिनांक 3.7.2007 रोजी श्रीमती उषा मोतीलाल उबाळे यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे की, सदरील इमारतीचे भाडे प्रतिमाह रू.1500/- मनपाने त्यांना अदा करावे व येणारे विद्युत देयक मनपाने भरावे. मनपा आरोग्य केंद्र हे मनपा तर्फे भाड्याने घेतलेले इमारतीत चालविले जाते व विद्युतदेयक मनपा भरते.

आरोग्य केंद्रात अखंडीत विद्युत पुरवठा असणे अनिवार्य आहे, त्याचे विद्युत देयक मनपाने भरावे व श्रीमती उषा मोतीलाल उबाळे रा.हर्सुल यांची इमारत आरोग्य केंद्रा करिता रू.1500/- प्रतिमाह भाडे तत्वावर घेण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

अ.रशीद खान मामू : किती एरिया घेणार आहे, नमूद केले नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी : 36.2 चौ.मी. एरिया आहे.

मा. सभापती : मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती उषा मोतीलाल उबाळे रा.हर्सुल यांची इमारत मनपा आरोग्य केंद्रा करिता रू.1500/- प्रतिमाह भाडे व विद्युत देयक मनपाने भरावे या अटीनुसार भाडेतत्वावर घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 58 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योतीनगर प्रभागात ओला व सुका कचरा वर्गीकरण बाबत नागरीकांची जनजागृती करणे, प्रमुख व अंतर्गत रस्ते यांची ठरवुन दिलेल्या वेळेत झाडलोट, साफसफाई करणे इत्यादी कामाकरीता रू.9.00 लक्षचे अंदाजपत्रक तयार करून निविदा सूचना प्रसिध्दीस देऊन निविदा मागविली असता, दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा पत्रके उपस्थित ठेकेदारां समक्ष उघडण्यात आली असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | विविम अॅग्रोटेक | 150% जास्त दराने | रू. 22,25,000.00 |
| 2. | **के. एम. सुरे** | 3% कमी दराने | रू. 08,73,000.00 |
| | 1. पी. एफ. | (13.61%) | रू. 1,18,815.00 |
| | 2. ई.एस.आय. | (4.15%) | रू. 41,467.00 |
| | 3. बोनस | (8.35%) | रू. 72,720.00 |
| | 4. सर्व्हीस टॅक्स | (12.24%) | रू. 1,35,374.00 |
| | | | **रू. 12,41,378.00** |

वरील पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री. के.एम.सुरे यांची आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जेशी : मा. आयुक्त चांगले काम करायला जतात परंतु त्यांचेवर आरोप होतात त्यासाठी हे रद्दच करावे.

मा.आयुक्त : जेवढा कचरा कमी वाहतूक केली तेवढा खर्च कमी येणार शासनाच्या स्कीमची आपण अमलबजवणी केली होती. त्यात असे होते की प्रत्येक घरोघरी जवून कचरा जमा करायचा जे ग्रीन कचरा आहे तो खूल्या जगेमध्ये खड्डा करून टाकायचा होणारे खत त्या संस्थानी विकायचे त्यात ज्या वस्तू भंगार म्हणून विकू शकतात त्याही त्या संस्थैनेच विकायच्या मॅग्झीमम २० टक्के कचरा ट्रान्सपोर्ट झाला पाहिजे बाकीचा कचरा त्याच भागात खूल्या जगेवर खड्डा करून टाकून खत केले जईल. यामूळे ट्रान्सपोर्ट खर्च बचत होईल. जे एव्हरेज खर्च येतो तो ५० टक्केचे जवळपास आहे. मा. न्यायालयाचेही असे आदेश होते की जस्तीत जस्त कचऱ्याची विल्लेवाट ही लोकल मध्येच व्हायला पाहिजे ही योजना सक्सेस झाली तर ट्रान्सपोर्ट खर्च बचत होईल.

श्री.संजय जेशी : खताचा प्रोजेक्ट चालू करणे सर्वमान्य असावे. खाुल्या जगांवर नगरसेवकांचा अधिकार नाही. नागरीकांना विचारणा करावी लागेल. ज्योतीनगर भागात सात ओपनस्पेस आहे. त्यात २ मंदीर, १ काव्य उद्यान, काही जगा नाल्यात गेली. त्याचे बाजूला लोक राहतात.

मा. आयुक्त : जेथे जगा मिळत आहे तेथे हे प्रकल्प करीत आहे. जर आपला उद्येश सफल झाला तर ट्रान्सपोर्ट खर्च कमी लागेल. कोणत्याही पध्दतीने करावे परंतू ट्रोन्सपोर्ट खर्च कमी होईल. पूर्ण शहरात राबविण्या ऐवजी एक वार्डात चाचणी घेवून बघू . जेथे शक्य होईल तेथे करता येईल.

श्री.संजय जेशी : प्रशासनाची कल्पना चांगली आहे. सर्वच वार्डात जसे फुलेनगर एकनाथनगर भागात ही योजना राबविता येणार नाही. रद्द करावे.

श्री.वसंत नरवडे : प्रायोगीक तत्वावर तीन महिण्यासाठी द्यावे. सक्सेस झाले तर इतरही शहरात मोकळया जगेवर करावे.

श्री. मंधुकर सावंत : ९८ वार्डात सुरू करावे तीन महिण्यासाठी द्यावे.

श्रीमती जयश्री किवळेवर : मा. आयुक्तांची चांगली कल्पना आहे परंतू ज्या अधिकाऱ्याकडे काम दिले जते ते अधिकारी जबाबदारीने काम करीत नाही याचा अनुभव आलेला आहे. जी एजन्सी साफसफाई साठी नेमली होती त्यांना सुका व ओला कचरा जमा करण्याचे निर्देश होते. परंतू एजन्सीने व त्या एजन्सीकडे नेमून दिलेले प्रशासनाचे अधिकारी यांनी या बाबतीत दखल घेतलेली नाही.

मा. सभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून हा विषय रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 59 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि. १८.५.२००७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सन २००७-०८ या वर्षात महानगरपालिका

शालेय विद्यार्थ्यांकरिता दोन जेड रंगीत गणवेश व एक जेड पांढरा गणवेश देण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केला आहे.

त्यानुसार गणवेश खरेदीकरिता राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. दि. २२.०६.२००७ ते दि. २९.६.२००७ पर्यंत निविदा विक्री करण्यात आली होती व दि. ०२.०७.२००७ रोजे निविदा स्विकारण्यात आल्या. एकुण ५ निविदा दर पत्रकांची विक्री झाली व या कार्यालयास एकुण ०४ निविदा प्राप्त झाल्या. दि. ०२.०७.२००७ रोजे सदर निविदा उघडण्यात आल्या. निविदा धारक पूढील प्रमाणे आहेत.

१) क्रिस्टल इंटरनॅशनल, पुणे
२) एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद
३) अंकीत कॉटेजइंडस्ट्रीज, पैठण
४) मफतलाल फॅब्रीक्स प्रा. लि. मुंबई

त्यांच्या प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जेडला आहे. त्यानुसार मे. मफतलाल फॅब्रीक्स प्रा. लि. मुंबई यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त दरात सर्वांत कमी होते. त्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे समक्ष दि.०६.०७.२००७ रोजे मे. मफतलाल फॅब्रीक्स यांचे सोबत दर कमी करणेबाबत वाटाघाटी केल्या असता त्यांनी निविदेत दिलेल्या दरापेक्षा १% कमी दराने साहित्य पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.

उपरोक्त प्रमाणे दरास मा. आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. शिक्षण विभागाने दिलेल्या विद्यार्थी संख्येनुसार गणवेष खरेदी करिता खर्च १,६४,९६,२२२/- एवढा अपेक्षित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेष सहाय्य योजनेअंतर्गत महानगरपालिका शालेय विद्यार्थी गणवेष खरेदीसाठी १.२५ कोटी एवढी तरतुद ठेवण्यात आलेली आहे. तथापि गणवेशाचा दर्ज व गुणवत्ता उच्चतम रहावी या हेतूने केवळ नामांकित कंपनीच्या ब्रँडेड कापडाचे गणवेष घेण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे अपेक्षित खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे रू. ३९,९६,२२२/- एवढा वाढीव खर्च लागणार आहे. त्यानुसार वाढीव रक्कम रू.३९,९७,०००/- ची तरतुद करण्यास्तव व मे. मफतलाल फॅब्रीक्स प्रा. लि. यांची सर्वात कमी दराची व निविदेत दिलेल्या दरापेक्षा १% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

(सोबत प्राप्त सर्वात कमी दराचा मे.मफतलाल फॅब्रीक्स प्रा.लि.मुंबई यांचे निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता व निविदा दरानुसार येणाऱ्या खर्चाचे विवरण)

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-08 या वर्षात महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांकरीता दोन जोड रंगीत गणवेश व एक जोड पांढरा गणवेश देण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मफतलाल फॅब्रीक्स प्रा.लि., मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार निविदेतील दरापेक्षा 1% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच अपेक्षीत खर्चात वाढ होत असल्याने वाढीव र.रू.39,97,000/- च्या अतिरिक्त तरतुदीसह, गणवेश खरेदीसाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रू.1,64,96,222/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 60 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आह की, बाबा पेट्रोल पंप चौक येथे फ्रि लेफ्ट टर्नसाठी स्वतंत्र मार्ग तयार करणे व डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.12,88,473/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखा शिर्षांतर्गत र.रू.1.5 कोटी मधून करण्यात येणार आहे. रस्त्याची एकूण लांबी 500 मीटर आणि रूंदी साधारणपणे 4 मीटर आहे. सदर कामात रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच रस्त्याच्या बाजूस साईड गटार बांधून पादचारी मार्ग तयार करणे या बाबींचा समावेश आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशीत केले आहे.

तरी सदरील कामासाठी र.रू.12,88,473/- च्या अंदाजपत्रक विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बाबा पेट्रोल पंप चौक येथे फ्रि लेफ्ट टर्नसाठी स्वतंत्र मार्ग तयार करणे व डांबरीकरण करणे, रस्त्याच्या बाजूस साईड गटार बांधून पादचारी मार्ग तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,88,473/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 61 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बायजीपुरा रहेमा मस्जीद ते एमजीएम रस्त्याचे (भागशः) आधुनिकीकरण करणे, कॉंक्रेटींग रस्ता बांधणे या कामासाठी सा.बां.विभागाचे सन 2006-2007च्या दरसूची प्रमाणे रक्कम रूपये 34,37,600/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची दि.20.2.2007 रोजी मंजुरी प्राप्त आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण तीन निविदा दरपत्रके भरून प्राप्त झाली व प्राप्त निविदा उघडण्यात आली असता त्यात खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | सय्यद समीउद्यीन रझवी | 10.21% कमी दराने |
| 2. | एस. ए. कन्स्ट्रक्शन | 7.86% कमी दराने |
| 3. | महमद सिद्यीकी आणि मो.अजहर सिद्यीकी | 4.59% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा 10.21% कमी दराची निविदा श्री.सय्यद समीउद्यीन रझवी यांनी दाखल केलेली आहे. सदर निविदा तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची आहे. तरी सदरील कामासाठी श्री.सय्यद समीउद्यीन रझवी यांची अं.प.दरापेक्षा 10.21% कमी दराची निविदा विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा रहेमा मस्जीद ते एमजीएम रस्त्याचे (भागशः) आधुनिकीकरण करणे, कॉंक्रेटींग रस्ता बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.21% कमी दराची श्री.सय्यद समीउद्यीन रझवी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 62 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, शंभु महादेव नगर व सहकार नगर अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रू.8,91,500/- असुन सदर कामाची निविदा मागविली असता मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची एकच निविदा प्राप्त झाली होती, त्यांचे दर

अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त असे होते. सदरील कामाची फेरनिविदा मागविल्यानंतर दोन निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 20% जास्त. |
| 2. श्री. ए. सी. कोठारी | अं.प.दरापेक्षा 25% जास्त. |

सदरील कामा संदर्भात दर पृथःकरण (Rate analysis) केले असता त्यांचे दर अं.प.दरापेक्षा 14.57% जास्त असे दर येतात. त्यास मा.आयुक्तांची मान्यता झाली असून मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू.8,91,500 + 14.57% **(1,29,829)** असे एकूण 10,21,329/- चे खर्चास मान्यता होणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शंभु महादेव नगर व सहकार नगर अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.57% जास्त दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस तसेच या कामासाठी लागणाऱ्या र.रू.10,21,329/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 63 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग अ, ब, क मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करणे या कामाचे रक्कम रू.32,22,686/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 8 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 8 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | रे कन्स्ट्रक्शन | 1.49% कमी दराने |
| 2. | विजय बिशनदास अरोरा | 5% जास्त दराने |
| 3. | चंद्रम्मा आशन्ना | 5% जास्त दराने |
| 4. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 5% जास्त दराने |
| 5. | के. बी. पाथ्रीकर | 5% जास्त दराने |
| 6. | एम. ए. सिद्दीकी | 8.79% जास्त दराने |
| 7. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 9.99% जास्त दराने |
| 8. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 15% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकांपैकी रे कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 1.49% ने कमी आहेत. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी रे कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 1.49% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग अ, ब, क मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.49% कमी दराची रे कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 64 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई उद्यानात विविध कामे करण्यास्तव सा.बां. विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.13.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.311 दि.20.3.2007 अन्वये मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ-निविदा/122/2007 दि.20.3.2007 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 02 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 02निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

1. उदय इंजिनिअरींग वर्क्स — 11% कमी दराने
2. मुबारक पठाण — 7.82% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 11% कमी दराची निविदा उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा.आयुक्तांनी सदरील निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

तरी उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई उद्यानात विविध कामे करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% कमी दराची उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 65 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा 1/2 मध्ये सद्य:स्थितीत 30 KVA क्षमतेचे जनरेटर कार्यरत आहे. प्रशासकीय इमारत टप्पा क्र.3 मध्ये जनरेटर बसविण्यात आलेले नाही. प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2 व 3 चा एकुण वीज भार 100 KVA आहे. करीता प्रशासकीय इमारत टप्पा 1/2 मध्ये कार्यरत 30 KVA क्षमतेच्या जनरेटर व्यतिरिक्त 125 KVA क्षमतेचे जनरेटर बसवून, ज्याची जोडणी प्रशासकीय इमारत 1, 2 व 3 मध्ये करणे आणि 125 KVA क्षमतेच्या जनरेटरची पर्यायी व्यवस्था, 30 KVA चे जनरेटरचा उपयोग Standby म्हणुन करणे प्रस्तावित आहे. त्यासाठी र.रू.9,99,140/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई.नि./87/2007 दिनांक 9.1.2007 अन्वये निविदा मागविल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी दोन निविदा विक्री झाल्या व स्विक.तीच्या तारखे पर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

1. मे. बिटा इलेक्ट्रीकल्स - अं.प.दरापेक्षा 20% जास्त दराने
2. मे.मॅग्नेटीक इलेक्ट्रीकल्स - अं.प.दरापेक्षा 17.3% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वा कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 17.3% जास्त दराची निविदा मे.मॅग्नेटीक इलेक्ट्रीकल्स यांची प्राप्त झालेली आहे. कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाची दरसूची 2004-05 नुसार तयार करण्यात आले असून, निविदेची प्रत्यक्ष कार्यवाही ही सन 2006-07 मध्ये झालेली आहे. सा.बां.विभागाची दरसूची 2006-07 नुसार प्राप्त दराची तुलना केली असता, प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% कमी आहेत. म्हणजेच सन 2006-07 च्या दरसूचीचे दर हे सन 2004-05 च्या दरसूचीपेक्षा 38% जास्त आहेत.

प्रकरणी कंत्राटदाराशी दराबाबत वाटाघाटी केल्या असता, अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराने काम करण्यास कंत्राटदाराने सहमती दर्शविलेली आहे. दरसूची सन 2004-05 च्या तुलनेत सन 2006-07 च्या दरसूचीमध्ये 38% वाढ झाल्याने, सन 2004-05 च्या दरसूचीनुसार मंजुरी प्राप्त असलेल्या अंदाजपत्रकासाठी कंत्राटदाराने वाटाघाटीअंती मान्य केलेले दर हे सन 2004-05 च्या अंदाजपत्रकानुसार 17.3% कमी येतात.

तरी उक्त प्रमाणे मे.मॅग्नेटीक इलेक्ट्रीकल्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराची निविदा स्विकारणे व येणाऱ्या एकूण रक्कम रू.11,49,011/- च्या खर्चास मान्यते बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा प्रशासकीय इमारत टप्पा 1/2 मध्ये कार्यरत 30 KVA क्षमतेच्या जनरेटर व्यतिरिक्त 125 KVA क्षमतेचे जनरेटर बसवून, त्याची जोडणी प्रशासकीय इमारत 1, 2 व 3 मध्ये करणे आणि 125 KVA क्षमतेच्या जनरेटरची पर्यायी व्यवस्था, 30 KVA चे जनरेटरचा उपयोग Standby म्हणुन करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील कामासाठी मे.मॅग्नेटीक इलेक्ट्रीकल्स यांची अं.प.दरापेक्षा 15% जास्त दराची निविदा स्विकारणेस व या कामासाठी लागणाऱ्या र.रू.11,49,011/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 66 :</u>**

शहर अभियंता, मनपा औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, कलाई महिला विकास बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद यांना कै. मिनाताई ठाकरे सभागृह, अयोध्यानगर, एन-7 म्हाडा कॉलनी, ज्याचे क्षेत्रफळ 205.72 चौ.मी. असून त्यास मा.आयुक्त व मा.स्थायी समिती यांनी सदरील सभागृह संस्थेस प्रति माह भाडे रू.1000/- व अनामत रक्कम रू.12000/- तसेच सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. व प्रचलित अटी शर्ती नुसार सदर संस्थेस भाड्याने देणेस यापुर्वी मान्यता दिलेली आहे.

सदरील संस्थेने दि.6-7-2007 रोजी विनंती अर्ज देवुन सदरील हॉल 29 वर्षाकरीता भाडेतत्वावर देणे बाबत विनंती केलेली आहे व त्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी मान्यता दिलेली आहे. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेस्तव सादर.

तसेच या जागे करीता सेवा शुल्क रू.5/- प्रति चौ.मी. प्रति माह व जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो संबंधीत संस्थेस भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करावा लागेल.

या कार्यालयास ज्यावेळी इमारतीची आवश्यकता वाटेल तेव्हा सदरील इमारत महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व सेवा शुल्कचा भरणा करून तसेच करारनामा करून भाड्याने देण्यात येईल.

करीता सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद खॉन | :२०५ चौ.मी. जगा १०००रू., सिध्दार्थ उद्यान टपरीसाठी २००/- भाडे तर ३६ चौ. मी. साठी १५००रू. प्रमाणे भाडे घेत आहोत. |
| मा. सभापती | : सर्वसाधारण सभेपूढे हा विषय मंजूरीसाठी जणार आहे.संबधीत अधिकारीयांनी खूलासा करावा. |
| प्र.मालमत्ता अधि. | : २०५.७२ क्वेअर मी. बांधलेले आहे. जिम्नॅशीयम हॉल आहे. |
| श्री.अ.रशिद खॉन | : सिध्दार्थ उद्यान मध्ये टपरीचे भाडे २०००/- येत आहे. एवढी मोठी इमारत १०००/-रू. भाडेने देत आहे हे योग्य नाही. |
| मा. आयुक्त | : प्रशासनाची तीच भावना आहे की १०००रू. प्रमाणे देवू नये. दोन वेळेस प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला होता. दोन्ही वेळेस स्थायी समितीने १०००रू. भाडे आकारावे म्हणून निर्णय दिला. रेग्यूलर व्हॅल्यू जी येते त्याप्रमाणे दयायला पाहिजे |
| श्री.अ.रशिद खॉन | : महापालिकेचे नूकसान करीत आहे एखादी पार्टीने मा. न्यायालयात दावा दाखल केला तर महापालिकेवर कार्यवाही होईल. स्थायी समितीने जरी ठराव केला असेल परंतू मोठी इमारत असेल तर जस्तीचे भाडे आकारून दयायला पाहिजे महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान होवू नये याची दखल घ्यावी. |
| मा. सभापती | : हेल्थक्लब तसेच समाजमंदीरसाठी १०००/-रू. असावे असा निर्णय तत्कालीन सभापती यांनी घेतलेला होता असे वाटते. जिम्नॅशीयम हॉलचा समावेश होता का याची माहिती द्यावी. |
| मा. आयुक्त | : सर्व इमारतीसाठी १०००रू. भाडे आकारावे असा निर्णय घेतलेला होता. ठरावीक इमारतीचा उल्लेख नाही. |
| श्री.वसंत नरवडे | : बी ॲण्डसीचे भाडे प्रति स्क्वेअर फुट ५ रू. भाडे आहे. त्याप्रमाणे ठेवावे. |
| मा.आयुक्त | :क्षेत्र बघून भाडे आकारणी व्हायला पाहिजे महापालिकेचे यात नुकसान आहे. |
| प्र.मालमत्ता अधि. | : यापूर्वीच्या बैठकीत जिमनॅशिएम हॉल साठी होते. पाच वर्षासाठी मंजूर झालेला होता पून्हा २९ वर्षासाठी मागणी केलेली आहे. त्यामुळे फेर प्रस्ताव सादर केलेला आहे. |
| श्री.अ.रशिद खान | : महापालिका मोठमोठया इमारती तयार करीत आहे. रिकाम्या पडलेल्या आहे. महापालिकेला इमारती भाडेने घेण्याची वेळ येत आहे. कोणत्या नियमाने १०००रू. भाडे केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम महापालिका करीत आहे. |
| मा. सभापती | : जिम्नॅशीयम हॉल, कम्युनिटी हॉल हे वेगळे आहेत. |
| श्री.वसंत नरवडे पाटील | : २०५ चौ.मी. साठी बी अँड सी चे दर रू.५/- प्रमाणे रू.१००००/- प्रती महा होते. नाममात्र ठरविणे योग्य वाटत नाही. बी अँड सी चे नियमाप्रमाणे करावे. |
| मा. सभापती | : हा प्रस्ताव स्थागित ठेवण्यात येतो. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 67 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सिडको, रामनगर एम-2 मधील रस्त्यांचे काँक्रेटींग करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे या कामाचे र.रू.35,43,391/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून निविदापत्रके मागविण्यात आली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | गोसावी एस. के. | 14.12% कमी दराने |
| 2. | सय्यद समीउद्यीन रझवी | 11.81% कमी दराने |
| 3. | ड्रीमलँड कन्स्ट्रक्शन | 7.86% कमी दराने |
| 4. | मो.सिद्यीकी मो.अझहर सिद्यीकी | 2.59% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री. गोसावी एस.के. यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 14.12% ने कमी आहेत. या मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.गोसावी एस.के. यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.12% कमी दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको, रामनगर एम-2 मधील रस्त्यांचे कॉंक्रेटींग करणे व स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.12% कमी दराची श्री.गोसावी एस. के. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 68 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करण्यास्तव सा.बां. विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.18,50,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.27.2.2007 ठराव क्र.245 अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन ई-निविदा क्र.08-07-03 दि.18.6.2007 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. गोसावी एस. के. | 10% कमी दराने |
| 2. | संतोष चव्हाण | 9.78% कमी दराने |
| 3. | ड्रिमलॅन्ड कन्स्ट्रक्शन | 5.79% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 10% कमी दराची निविदा श्री.गोसावी एस.के. यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा.आयुक्तांनी सदरील निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

तरी श्री. गोसावी एस.के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 10% कमी दराची श्री. गोसावी एस. के. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 69 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाधववाडी येथील नियोजित वाहतुकनगर मध्यवर्ती जकात नाका गोडाऊन विकसीत करणेच्या कामासाठी सा.बां. विभागाचे दरसुची सन 2006-07 नुसार प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.85,37,276/- चे असून या कामाचा खर्च सन 2007-2008 या आर्थिक वर्षातील वाहतुक नगर विकसीत करणे या लेखा शिर्षा अंतर्गत प्रस्तावित आहे. या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण चार भरलेली निविदा पत्रके प्राप्त झाली. सदर निविदेचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. गोसावी एस. के. | 9.90% कमी दराने |
| 2. | मे.अमन असोसिएट्स | 0.79% कमी दराने |
| 3. | मो.सिद्यीकी आणि मो.अजहर सिद्यीकी | 4.29% जास्त दराने |
| 4. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | 11.12% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.गोसावी एस.के. यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.90% कमी दराची आहे. करीता श्री.गोसावी एस.के. यांची अं.प.दरापेक्षा 9.90% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाधववाडी येथील नियोजित वाहतुकनगर मध्यवर्ती जकात नाका गोडाऊन विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.90% कमी दराची श्री. गोसावी एस. के. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 70 :** (स्थायी समिती सभा दि.29/5/2007 मध्ये स्थगित ठेवण्यात आलेल्या प्रस्ताव-विषय क्र.32)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागात सद्य:स्थितीत जवळपास एकुण 1000 पथदिवे आहेत. सदर पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिका फंडातून करण्यात येते. या कामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी लागते तसेच सदर पथदिव्यांच्या विद्युत बिलापोटी महानगरपालिका महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस देयके अदा करते.

चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील पथदिव्यांची समस्या दुर करण्यासाठी Replacing of existing 70/150/250W HPSV street light fittings by energy efficient street light fittings on BOT Basis in MIDC Chikalthana area Aurangabad या कामाकरीता सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला. यामध्ये स्पर्धात्मक निविदा मागवून चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागात Energy Efficient दिवे स्वखर्चाने लावणे व दहा वर्षापर्यंत या दिव्यांची देखभाल स्वखर्चाने करणे, त्या पोटी प्रतिमाह प्रती दिवा (Pole) सुरूवातीस स्वखर्चाने लावलेल्या दिव्यांचा खर्च तसेच दिव्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी जी एजन्सी महानगरपालिकेकडून कमीत-कमी रक्कम आकारेल त्या एजन्सीला काम देणे बाबतचा अंतर्भाव होता.

याबाबत मा.आयुक्त महोदय यांच्या शिफारशी नुसार दिनांक 20.2.2007 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येऊन विषय क्र.710 अन्वये मान्यता झालेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना No.AMC/Eon/Tender/115/2007, Date 14.03.2007 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी चार निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत दर भरलेल्या चार निविदा प्राप्त झाल्या. त्या दिनांक 7.4.2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तपशील तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर | रूपये 1,81,80,000/- |
| 2. | मे. विनवॉक सिस्टीम, नाशिक | रूपये 3,12,00,000/- |
| 3. | मे. एशियन इलेक्ट्रीकल्स | आकड्यात दर दिले नाही. |
| 4. | मे.ब्राईट इलेक्ट्रीक वर्क्स, अमरावती | रूपये 2,05,50,000/- |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर मे. सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांचे रूपये 1,81,80,000/- आहे. त्यांनी दहा वर्षाच्या कार्यकाळासाठी दिलेल्या प्रति माह/वर्ष निहाय रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **वर्ष** (कार्यादेशाच्या दिनांकापासून) | **एजन्सीचा दर** | |
|---|---|---|---|
| | | प्रति **माह** करिता | प्रति **वर्षा** करिता |
| 1. | 2. | 3. | 4. |

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | पहिले वर्ष | 2,35,000/- | 28,20,000/- |
| 2. | दुसरे वर्ष | 2,30,000/- | 27,60,000/- |
| 3. | तिसरे वर्ष | 2,20,000/- | 26,40,000/- |
| 4. | चौाथे वर्ष | 1,20,000/- | 14,40,000/- |
| 5. | पाचवे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |

| 1. | 2. | 3. | 4. |
|---|---|---|---|
| 6. | सहावे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 7. | सातवे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 8. | आठवे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 9. | नववे वर्ष | 1,10,000/- | 13,20,000/- |
| 10. | दहावे वर्ष | 1,60,000/- | 19,20,000/- |
| | **एकूण :-** | **1,81,80,000/-** | **1,81,80,000/-** |

उक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा मे. सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांचे रक्कम रूपये 1,81,80,000/- च्या दरास मंजुरी मिळणे बाबत मा.आयुक्तांनीप्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी मे.सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांची दहा वर्षाच्या कालावधीसाठी रक्कम रू.1,81,80,000/- ची निविदा स्विकृत करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्रीमती जयश्री किवळेकर : 29-50-07 ला विनंती केली होती की, सिडको भागात जे काम या एजन्सीमार्फत करण्यात आले, त्यावर झालेल्या खार्चासंबंधीची माहिती मला देण्यात यावी ती अद्याप मिळालेली नाही. सोनु इलेक्ट्रीकल्स ही एजन्सी सिडकोतील पथदिव्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम करते. त्यांचा रिझल्ट वाईट आहे. नागपुरवरून नेमलेली एजन्सी आहे. 25-26 तक्रारी दिल्या, ते तक्रारी घेतात, एक लाईट, होल्डर घेवून माणूस पाठवतात. 25 मधील एक लाईट दुरूस्त होतो. चार महिन्यांपासून त्यांचे काम झिरो आहे. कोणतेही काम होत नाही. पुन्हा त्याच एजन्सीला चिकलठाणा एमआयडीसी सिडकोचे काम सुपूर्द करू नये.

श्री.अ.रशीद खान(मामू) : सोनू इलेक्ट्रीक या एजन्सीला हे काम झेपणार नाही. दुसऱ्या क्रमांकाचे जे निविदाधारक असतील त्यांना हे काम देण्याचा निर्णय घ्यावा. सहा महिन्यांपासून साहित्य मागवत नाही. IInd लोएस्ट निविदाधारक या दराने करावयास तयार असतील तर त्यांना काम द्यावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : स.सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. सदर एजन्सी काम करीत नाही. ठेका रद्द करावा.

मा. सभापती : सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता, सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांचे काम समाधानकारक नसल्याचे स्पष्ट होते. या कामासाठी दुसरे कमी दराचे निविदाधारक मे.ब्राईट इलेक्ट्रीक वर्क्स, अमरावती, जर ते सोनु इलेक्ट्रीकल्स च्या अटी शर्ती व दरानुसार काम करण्यास तयार असतील तर त्यांना काम देण्यात यावे. याबाबत विचारणा करण्यात यावी. सर्वात कमी दरानुसार काम करण्यास

तयार असल्यास सदरील काम मे. ब्राईट इलेक्ट्रीक वर्क्स, अमरावती यांचे मार्फत करून घ्यावे. अन्यथा फेर निविदा मागविण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पथदिवे देखभाल दुरूस्तीचे काम करणारे मे.सोनु इलेक्ट्रीकल्स, नागपुर यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे, चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागातील पथदिव्यांची समस्या दुर करण्यासाठी Replacing of existing 70/150/250W HPSV street light fittings by energy efficient street light fittings on BOT Basis in MIDC Chikalthana area Aurangabad या कामाकरीता दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ब्राईट इलेक्ट्रीक वर्क्स, अमरावती यांना सर्वात कमी दराचे निविदा दरानुसार काम करण्यास तयार आहात काय? याबाबत विचारणा करण्यात यावी. सर्वात कमी म्हणजेच प्रस्तावात नमुद तक्त्यातील अ.क्र.1 ते 10 मध्ये दर्शविलेल्या दरानुसार, (एकूण र.रू.1,81,80,000/-मध्ये) काम करण्यास तयार असल्यास सदरील काम मे. ब्राईट इलेक्ट्रीक वर्क्स, अमरावती यांचे मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अन्यथा फेर निविदा मागविण्यात याव्यात, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 71 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा विभाग) प्रस्ताव सादर करीत आहेत की, नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी वॉर्ड क्र.80 अंबिकानगर, मुकुंदवाडी येथे 100, 150, 200, 300 मी.मी. व्यासाची डी.आय.के.9 जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.31,75,780/- असुन शासनाकडून मजीप्रा/ले.शा./निधी/2007 दि.14/4/2007 नुसार 31,75,700/- रक्कमेचा निधी प्राप्त झालेला आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एकुण 2 निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. उदय इंजिनिअरींग वर्क्स - 32% जास्त दराने
2. सुरेश बी. साधवानी - 36% जास्त दराने

उपरोक्त प्रामाणे प्राप्त निविदांमध्ये उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त आहेत. त्यास मा.आयुक्त यांची शिफारस झालेली आहे.

तरी उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी वॉर्ड क्र.80 अंबिकानगर, मुकुंदवाडी येथे 100, 150, 200, 300 मी.मी. व्यासाची डी.आय.के.9 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराची उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 72 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील ड्रेनेज चोकअप व ड्रेनेज लाईन मधील मलमिश्रीत गाळ काढण्यासाठी तसेच अतिवृष्टीच्या काळात निवासी भागात साचलेले पावसाचे पाणी काढण्याकरीता Solid Handling Pump and Trash Pump खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

प्राप्त दरपत्रकानुसारच्या आधारभुत किंमतीनुसार Solid Handling Pump and Trash Pump एकूण तीन सेट ची अंदाजपत्रकीय रक्कम रू.18,45,000/- इतकी होत आहे. Solid Handling Pump and Trash Pump खरेदीचे रक्कम रू.18,45,000/- चे अंदाजपत्रकास

मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केली आहे. सदर पंप सेट खरेदी ही अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी करणे या लेखाशिर्ष मधून प्रस्तावित आहे.

करीता सदर कामासाठी र.रू.18,45,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.संजय जेशी | : या प्रस्तावा विषयी माहिती देवून या विषयी डेमो दाखवून नंतर हा प्रस्ताव सादर केला तर योग्य होईल. ॲटो डीसीआर आपण मंजूर केल्यानंतर सहा. संचालक नगररचना यांना काय काम असणार आहे. १९८२ ला महापालिका झालेली आहे. तेंव्हापासून बॉयलॉज बदलण्याचे एका सहा. संचालक याना वाटले नाही जे १९८२ -८४ ला जे बॉयलॉज पार्कींगचे रूल होते. तेच अजूनही आहे. याचा अर्थ शहरात तेंव्हा जेवढया कार मोटार होत्या तेवढयाच आहे. वाहनाची साईज वाढलेली नाही का दोन्ही बदलावे दोन्ही सभागृहासमोर ठेवावे. बिल्डींग बायलॉज्ही बदलावे म्हणजेस्टॅडर्ड करावे. |
| मा. आयुक्त | :ॲटो डीसीआर मधये आपण ऑलरेडी मंजूर केलेले आहे. जे इमारत परवानगी दिली जते त्यास फारसा वेळ जतो. हे सर्व करण्यासाठी कॉम्प्युटर प्रोग्राम तयासर केलेला आहे. त्याचे मार्फत इमारतपरवानगीची तपासणी होईल. त्यानंतर इमारत परवानगी देवू शकतो. १०००रू. रजिस्ट्रेशनसाठी स्थायी समितीकडे हा प्रस्ताव आलेला आहे. अपडेट करून रजिस्टेशन घ्यायचे आहे. आर्कीटेकटवर काही बंधन नाही. १०००रू. नॉमीनल फिस ठेवलेली आहे. पूण्याच्या धर्तीवर वापर करीत आहे. तेथे चार वर्षापासून चालू आहे. पूणे मध्ये ॲटो डीसीआर स्वत: कडे ठेवलेला आहे. जे काही प्रोग्राम लागतो तो आर्कीटेक्टने विकलेला आहे. आपले म्हणणे असे की त्या एजन्सीने विना मुल्य द्यावे. आणि ॲटो डीसीआरची प्रत आपण आर्कीटेक्टला देणार ते तपासून आणून देतील जे की महानगरपालिकेच्या रेकॉर्ड प्रमाणे आहे की नाही.जर आपल्या बॉयलॉजप्रमाणे असेल तरच परवानगी देवू शकतो. जितक्या बाधंकाम परवानगी देणार त्याचे इलेक्ट्रानिक फॉर्मेटमध्ये आपल्याकडे प्लॅन राहिल. आणि दुसऱ्याच दिवशी इंटरनेटवर टाकणार की ही बांधकाम परवानगी मंजूर केलेली आहे. |
| श्री.संजय जेशी | : पाच मिनीटात ॲटो डिसीआर प्रमाणे बांधकाम परवानगी देवू शकतो. |
| मा.आयुक्त | : आपल्याकडे डेमो दिल्यानंतर ॲटो डीसीआर प्रमाणे सुरू करण्यात येईल.यात ज्यांना६.६ ची स्पेशल परवानगी लागते ते वगळून असेल. |
| श्री.संजय जेशी | : ६.६ चे अधिकार आयुक्ताना असेल परंतू ओपन स्पेसमध्ये रिलॅक्सेशन देण्याचे अधिकार नाही. जेंव्हा संचिका सादर होईल साईट व्हिजेट होणार की नाही. |
| मा. आयुक्त | : साईट व्हिजेट तसेच लेन्थ तपासणी होईल. आर्कीटेक्ट कडे कॉन्सिल ऑफ आर्कीटेक्टचे रजिस्ट्रेशन असते महापालिकेचे नाही. या आगोदर आपल्याकडे रजिस्टेशन नव्हते. |
| श्री. संजय जेशी | : या बद्दलचा डेमो घेवू नंतर मंजूर करावे. |
| मा. आयुक्त | : सुरू करण्या आधी डेमॉन्स्ट्रेशन देऊन सुरू केले जाईल. |
| मा. सभापती | : डेमॉन्स्ट्रेशन देऊन सुरू करावे. सदर प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील ड्रेनेज चोकअप व ड्रेनेज लाईन मधील मलमिश्रीत गाळ काढण्यासाठी तसेच अतिवृष्टीच्या काळात निवासी भागात साचलेले पावसाचे पाणी काढण्याकरीता Solid Handling Pump and Trash Pump तीन सेट खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.18,45,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 73 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा विभाग) प्रस्ताव सादर करतात की, Auto DCR या संगणकीय कार्यप्रणालीद्वारे विकास परवानगी अनुज्ञेय करण्याची योजना लवकरच सुरू होत आहे. या कार्यप्रणालीद्वारे विकास परवानगी प्रस्ताव दाखल करण्यासाठी वास्तुविशारद, अभियंता व पर्यवेक्षक यांचे नोंदणीकरण करणे आवश्यक आहे.

करीता शहरातील वास्तुविशारद, अभियंता व पर्यवेक्षक यांचेकडून नोंदणी शुल्क रूपये 1000/- घेऊन Auto DCR कार्यप्रमाणालीद्वारे प्रस्ताव सादर करण्यासाठी नोंदणीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. वरील प्रमाणे नोंदणीकरण करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे Auto DCR या संगणकीय कार्यप्रणालीद्वारे विकास परवानगी अनुज्ञेय करण्याच्या योजने अंतर्गत विकास परवानगी प्रस्ताव दाखल करण्यासाठी वास्तुविशारद, अभियंता व पर्यवेक्षक यांचे नोंदणीकरण करणे व त्यासाठी नोंदणी शुल्क रूपये 1000/- आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 74 :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 30(1) नुसार विशेष समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. विशेष समित्यांचे सभापती त्यांच्या दालनात येणाऱ्या अभ्यागतांसाठी आतिथ्य भत्त्यास यापुर्वी मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच विशेष समित्यांचे सभापती यांना वाहनासाठी वाहन इंधन भत्ता प्रति माह रू.12500/- अदा करावा म्हणून विशेष समित्यांचे सभापती यांनी महानगरपालिकेकडे विनंती केलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेचे विशेष समित्यांचे कार्यक्षेत्र, अधिकार व्याप्तीच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता विशेष समिती सभापतींना रू.10,000/- प्रति माह खाजगी वाहन भत्ता विशेष बाब म्हणून अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद खॉन | : हा खर्च कशातून दिला जणार आहे. गट नेता यांना ही देण्यात यावे.लिगली कार्यालय दिले. त्याना ही देण्यात यावे. |
| लेखाधिकारी | :इंधन देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षकातून देण्यात येणार आहे. |
| मा. आयुक्त | :पार्टीचा एकच व्यक्ती आल्यावर त्यास गटनेता करीत नाही. जनरल ज्यांचेकडे एकूण संख्येच्या १० टक्के संख्या असतील त्यातून एक गटनेता करतो जनरली करतो रूल नाही. २६० लिटर प्रतिमहा त्यांना कार्यालयीन कामासाठी इंधन देत असतो. गट नेत्याकडे ऑफिशियली काम नसते. म्हणून देता येत नाही. |
| मा.सभापती | : या संबधी इतर महानगरपालिकेतून माहिती घेवून निर्णय घेता येईल स्थगिती देण्यात येते. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद